# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. २९/०७/२०११**

आज शुक्रवार दि. २९/०७/२०११ (दि. २०/०७/२०११ ची तहकुब सभा) रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. ११/०७/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | शेख आसिफ गुलाब | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ८) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ९) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| १०) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १७) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १८) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १९) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २०) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २१) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २२) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २३) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २५) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| २६) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| २७) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| २८) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| २९) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३०) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३२) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३३) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३४) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ३५) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ३६) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ३७) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ३८) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ३९) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४०) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४१) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४४) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४५) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ४६) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ४७) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ४८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ४९) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५०) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५१) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५२) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५३) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५४) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५५) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५६) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५७) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५८) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५९) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६०) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६१) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६२) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६३) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ६४) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ६५) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| ३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ४) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| ५) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ६) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ७) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ८) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ९) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| १०) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ११) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| १२) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| १३) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| १४) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| १५) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| १६) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| १७) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| १८) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |

**नगरसचिव :-**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा बुधवार दि. २०/०७/२०११ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील विषय क्र. ३९ ते ४० व पुरक घोषणा क्र. ४१ ते ४५ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा शुक्रवार, दिनांक

२९/०७/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे. अनिल सावंत ह्याची लक्षवेधी स्विकारली तिथून कामकाजाला सुरुवात होते.

प्रति,
मा. सचिव सो.,
नगरसचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन सेवे अंतर्गत पी.पी.पी. तत्वावर चालविण्यात येणाऱ्या बस सेवेबाबत.

महोदय,

वरील विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन सेवे अंतर्गत साधारण ९ महिन्यांपूर्वी ठेकेदारास शहरामध्ये व शहराबाहेर २५० बसेस चालविण्याचा ठेका दिलेला होता. परंतु अद्याप या सर्व बसेस शहरामध्ये चालू झालेल्या नाहीत. त्यामुळ नागरीकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. व महानगरपालिकेचे उत्पन्नही बुडत आहे. सदर विषयावर येणाऱ्या महासभेमध्ये लक्षवेधी सुचनेद्वारे चर्चा होणेबाबत.

१) आज शहरामध्ये २५० बसेस धावत नाहीत.
२) मिरा भाईंदर शहराबाहेर ठाणे, मुंबई प्रवासी संख्या जास्त असूनही बसेस धावत नाहीत.
३) ठेकेदाराने आजपर्यंत एकही नवीन बस थांबा बांधलेला नाही अथवा नुतनीकरण केलेले नाही.
४) ठेकेदाराने मेंन्टेनन्ससाठी व बस पार्कींगसाठी व्यवस्था केलेली नाही.
५) ठेकेदाराचे बसेसच्या देखभालीसाठी स्वतःचे वर्कशॉप शहरामध्ये असणे गरजेचे असूनसुध्दा अद्याप त्याने त्याबाबत काहीही केलेले नाही.

वरील बाबींचा विचार करता सदर ठेकेदाराने करारनाम्यामधील अटींची पुर्तता केलेली नाही, ही बाब अतिशय गंभीर आहे व त्या दृष्टीने महासभेमध्ये चर्चा होणे गरजेचे आहे.

तरी ही लक्षवेधी स्विकारण्यात यावी ही विनंती.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब मागच्या वेळेला सभागृहात बराच गोंधळ झाल्यामुळे सभा तहकुब झाली होती. त्यावेळेला आम्ही एक मागणी केली होती. सभेच्या कामकाजाला वेळेला पिठासीन अधिकारी म्हणून व्यासपीठावर कोणी कोणी बसायचे मा. सचिवांना आम्ही विचारले होते की नियमाप्रमाणे मा महापौर आणि मा. आयुक्तांनी आणि सचिवांनी बसायचे. त्याप्रमाणे सचिवांनी अजून काही माहिती घेतली असेल तर सचिवांनी खुलासा करावा म्हणजे सभा कामकाज सुरु करता येईल.

**नगरसचिव :-**

डायसवर बसण्यासंबंधी काही स्वतंत्र्य नियम नाहीत पण संकेत होते. संपूर्ण ठाणे जिल्ह्यात व महाराष्ट्रामध्ये डायसवर उपमहापौर बसतात. त्याबद्दल कोणाचे ऑब्जेक्शन असेल तर सभागृहाने त्याचा निर्णय घ्यावा.

**नरेंद्र मेहता :-**

हा नियमातला भाग आहे.

**नगरसचिव :-**

ते संकेत आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

महापौर साहेब, लक्षवेधी पुकारलेली आहे. त्याच्यावर चर्चा करावी पुन्हा विषय सोडुन चर्चा झाली तर परत दंगे होतील सभागृहाचे कामकाज करायचे आहे की, फक्त वादविवाद करायचे

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही वाद घालत नाही हा प्रश्न कायम स्वरुपी सुटणार आम्हाला फक्त खुलासा झाला तर बरं होईल. विषय असा आहे की, मागच्या वेळी सगळ्या नगरसेवकांना सभेच्या कामकाजाबाबत ट्रेनिंगला घेऊन गेले होते. त्यावेळेला मा. सचिव साहेब होते. आमच्या पक्षातले बरेचसे नगरसेवक होते. त्या ट्रेनिंगमध्ये आम्हाला असे सांगितले की, व्यासपिठावर फक्त मा. आयुक्त, मा. महापौर आणि मा. सचिवांनी बसायचं अशी माहिती आम्ही सचिवांकडुन देखील घेतली. आपण जर एका ठिकाणी लाखो रुपये खर्च करुन ट्रेनिंगला घेऊन जाता तर त्या ट्रेनिंगचं काय महत्वच राहील नाही. आम्हाला ही शिक्षा दिली गेली की, कामकाजाची ही पध्दत आहे. सचिवांनी खुलासा करावा की त्यांनी जे नियम सांगितले त्याचा ह्या सभागृहात काही अर्थ नाही का?

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर की परवानगीसे सन्मा. सदस्य ने एक प्रश्न किया है की, ट्रेनिंग मे गये थे मेरा ऐसा मानना है की, ट्रेनिंग मे खुद सन्मा. सदस्य नही थे। मै उस ट्रेनिंग मे था। उस ट्रेनिंग मे व्यासपीठ पे कोई भी जिक्र नही किया गया था। सचिव साहब, आप खुद भी वहाँ थे तो मैने आप से पुछा था की उसका कोई नियम है क्या? तो कोई भी नियम मुंबई प्रांतिक अधिनियम मे है या दुसरी कोई नियमावली बनाई गई है की

व्यासपीठ पे कौन बैठना चाहीए और कौन नही महापालिका गठन होने के बाद इस सदन मे तिसरा कार्यकाल चल रहा है। जो परंपरा सदन रखी उसी परंपरा का निर्वाह आजतक हो रहा है। सन्मा. सदस्य आज सदस्य है इसके पहले वो भी महापौर थे। उस महापौर के कार्यकाल मे उन्होंने तमाम नियमोंको साईड मे रखे और कभी भी नियम के उपर चर्चा नही करनी चाहीए तब उनको नियम याद नही आये की व्यासपीठ पे कौन बैठना चाहीए कौन नही बैठना चाहीए। अभी सन्मा. दुबेजी ने कहाँ की जब जब सभा का कामकाज चालू होता है। तब तब कुछ न कुछ अडचण पैदा करके सभा के कामकाज मे विघ्न डालते है। मा. सचिव साहब ने स्पष्ट निर्देश दिया है की, कामकाज मे ऐसा कुछ भी नियम नही है। इसिलिए मे महापौर साहब से निवेदन करता हूँ की इस कामकाज को आगे चलाए।

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब मला ह्याच विषयावर बोलायचे आहे. ठाणे महानगरपालिकेत जी व्यवस्था आहे ती आपण ॲडोप्ट का करत नाही. ह्याच सभागृहातून सन्मा. निर्मला सावळे असताना वरचे अधिकारी खाली उतरवले होते. असेंब्लीमध्ये जे रेकॉर्ड करतात ती माणसे खाली पाहिजेत. ठाणे महानगरपालिकेचे सभागृह तुम्ही जाऊन बघा. प्रत्येक वेळेला ठाणे महानगरपालिकेचं उदा. देता तर ठाण्याचे सभागृह जाऊन बघा.

**प्रभात पाटील :-**

महापौरांनी बसायला सांगितलं तर बसा ते बोलले तुम्हाला बोलायला संधी देणार आहेत. एकेकाने शिस्त पाळली तर सभागृहाला शिस्त लागेल.

**नरेंद्र मेहता :-**

माझं एवढंच मत आहे की, सभागृहात हा विषय पुन्हा पुन्हा येता कामा नये. एखादा खुलासा झाला तर बरं होईल. नगरसचिवांनी मला फक्त एवढं सांगावं की, नगरसेवकाच्या ट्रेनिंगमध्ये सांगितलं नाही तर आमचा विषय तिथे संपला आणि उपमहापौरांनी तिथे सन्मानाने बसावं कारण उपमहापौर कुठल्या पक्षाचे बसतात ते सगळ्या पक्षाचे आहेत.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मा. महापौर साहेब, हा विषय माझ्याशी संबंधीत आहे तर मला पण बोलायची संधी द्या. तर मला पण बोलायची संधी द्या. माजी महापौर नरेंद्र मेहता मुंबई प्रांतिक अधिनियम आणि इतर सभा शास्त्राचे खुप प्रचंड अभ्यास करुन आलेले आहेत. कुठल्या ट्रेनिंगमध्ये गेले आणि तिथे काय-काय शिकले त्याच त्यांना ज्ञान आहे. सभेमध्ये नियमानूसार सभा चालायला पाहिजे हे त्यांना माहित आहे त्यामुळे त्यांनी केलेले पराक्रम मी आपल्याला वाचून दाखवतो. त्याच्या महापौर पदाच्या काळामध्ये एका महिन्यात सभा व्हायला पाहिजे असे असताना त्यांनी कधी सभा घेतल्या नव्हत्या सभागृहाच्या चार स्थायी समिती सदस्यांनी मागणी करुन देखील त्यांनी सभा घेतली नव्हती हे त्यांना माहिती असेल. नगरसेवक निवडुन आल्यांनतर हनुमंत मालुसरे नावाच्या व्यक्तीने तक्रार केली कारण त्यांनी पैसे मागितले तेव्हा ह्यांना नियम माहित नव्हते. ह्याच सभेमध्ये ह्याच ठिकाणी ते महापौर पदावर बसले तेव्हा त्यांच्या शेजारी उपमहापौर बसत होते हे कदाचित त्यांना दिसत नसेल. ओमप्रकाशजींना दिसत नाही असं समजतो परंतु ह्यांनापण दिसत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

कोणाला व्यक्तीगत बोलण योग्य नाही.

**(सभागृहात गोंधळ)**

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ह्या व्यक्तीने महापौर असताना स्वतःच्या भावाच्या फ्लॅटमध्ये कनेक्शन दिलं. ते त्यांनी कुठल्या नियमानूसार दिलं होतं ते त्यांनी सभागृहाला सांगीतलं पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, ह्या सभागृहामध्ये विचारायचं अधिकार नाही. सचिव साहेब, हे जे काय बोलले आहेत ते प्रोसिडींगमधुन उडवायला लागेल. त्यांना अधिकार नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ज्या ठाणे महापालिकेत बीजेपी शिवसेनेची सत्ता आहे त्या ठाणे महापालिकेचा ह्यांनी अभ्यास करावा. त्याठिकाणी उपमहापौर कुठे बसतात ते त्यांनीच आम्हाला सांगावं. ह्या प्रश्नाचं उत्तर द्या.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, मी सांगितलं की, आम्हाला वाद घालायचा नाही. आम्हाला तो विषय संपवायचा आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्ही एवढा अभ्यास केला आहे ना उत्तर द्या.

**नरेंद्र मेहता :-**

उत्तर देतो. सचिव साहेब त्यांना माझ्याकडून उत्तर मागायचं कुठल्याही कायद्यात नाही. प्रशासनाला जाब विचारायचं, सभागृहाला रुलिंग द्यायचा अधिकार फक्त महापौरांना आहे हे तुम्हाला स्टॅम्पवर लिहून देतो.

**भगवती शर्मा :-**

उपमहापौर साहेब, ते बरोबर बोलतात या सदनमध्ये रुलिंग मा. महापौरांचे चालतात तरी ते नेहमी सचिवांना का विचारतात. तुमचं नेहमीचं आहे सचिव-सचिव म्हणून का करतात तुम्ही सांगितलं आहे मग महापौरांना विचारा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ठाणे महापालिकेतून एक पत्र आलं आहे मी वाचून दाखवतो.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला वाचून दाखवायचा अधिकार नाही ना.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सभागृहातील आसन व्यवस्थेबाबत माहिती मिळणेबाबत ठाणे महानगरपालिका उपरोक्त संदर्भिय पत्रानूसार आपणांस कळविण्यात येते की, सद्यस्थितीत ठाणे महानगरपालिकेच्या सन्मा. सदस्याची एकूण संख्या १२१ - ११६ + ५ स्विकृत असून ठाणे महापालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सन्मा. सदस्यांसाठी १२४ आसन व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रेक्षक गॅलरीमध्ये प्रेक्षकांची संख्या ५० व पत्रकारासाठी १६ अशी आसन व्यवस्था करण्यात आलेली आहे. डायसवर ठाणे महापालिकेचे मा. महापौर, मा. उपमहापौर हे सभेच्या वेळी शेजारी शेजारी बसतात कळलं का?

**नरेंद्र मेहता :-**

माहिती आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सभागृहाची टाईमपास करायची तुम्हाला सवय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

चांगल माहिती आहे. तुम्हाला पुन्हा सांगतो. मला असं बोलायचा अधिकार नाही. मा. महापौर साहेब डायसवरुन रूलिंग दयायचा संपूर्ण अधिकार आपला आहे. आपण तिकडे कोणालाही बसवल तर त्यांना तो अधिकार प्राप्त होत नाही. संपूर्ण अधिकार आपला आहें. आपण रुलिंग देऊ शकता. आपणच सभा कामकाज चालवु शकता सभेला उत्तर आपणच देऊ शकता.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मी पण नगरसेवक आहे तर मला ह्या सभेमध्ये मत मांडण्याचा अधिकार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही मा. महापौराना सांगा. मला सांगायची गरज नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मी रुलिंग देत नाही. तुम्ही जेवढ बोलू शकता तेवढ मी सुध्दा बोलू शकतो.

**नरेंद्र मेहता :-**

आपण सन्मानाने तिकडे बसा. तुम्ही शहराचे उपमहापौर आहात. कूठल्या पक्षाचे नाहीत.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

स्वतःचे हात बरबटलेले आहेत ह्याचा विचार करा .

**नरेंद्र मेहता :-**

माझा अभ्यास चांगला आहे. मा. महापौर साहेब त्यांनी बसाव त्यांच्यात आमच काही मत नाही.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्ही कोण ठरवणार.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला मला बोलायचा अधिकार नाही. सचिव साहेब त्यांनी जे मला बोलल आहे ते तुम्ही प्रोसिडिंगमधून काढून टाका.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्हाला अजुन महापालिकेची माहिती देऊ का ?

**नरेंद्र मेहता :-**

आमच जे म्हणण आहे ते आम्ही सांगितल. मा. महापौर साहेब मागच्या वेळेला सन्मा. जंगम साहेबानी गंभीर आरोप लावले होत. मी मा. आयुक्ताकडे निवेदन दिलं. महत्वाचं असं की ज्याठिकाणी आपण गुन्हा दाखल केला मी स्वतः जाऊन सर्व्हे केला ती जागा महापालिकेची नाही महापालिकेची जी जागा आहे त्याच्यावर झोपडे वसलेले आहेत. म्हणजे अधिकाऱ्यांनी कुठला विषय दिला माहित नाही. पेपर मध्ये आज बातमी आहे उपमहापौर पोलिस अधिक्षकाकडे तक्रार आणि आपल्या एका अधिकाऱ्याने त्यांना भंगी अर्वाच्य भाषेत आणि जिवाच धोका आहे अशी तक्रार पोलिस स्टेशनला दाखल केली अशी पेपरला बातमी आहे. त्याबद्दल आपण किंवा प्रशासनाने खुलासा करावा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मी माहिती देतो. माझ्या संबधी आहे ना.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांना माहिती दया. मी त्यांना विचारल आहे.

**शशिकांत भोईर :-**

महापौर साहेब, ही सभा चालू आहे की वैयक्तिक भांडण चालू आहेत त्याचा खुलासा करावा. आणि तहकुब सभेचे जे विषय आहेत तेच घ्या. अन्य गोष्टीवर चर्चा करू नका.

**नरेंद्र मेहता :-**

पेपरला बातमी आहे.

**शशिकांत भोईर :-**

पेपरच्या बातमीवर सभा चालत नाही. मा. महापौर साहेब विषयाला हात घाला लक्षवेधी चालू दया.

**नरेंद्र मेहता :-**

जंगम साहेबांनी मागच्या वेळेला हयाच्यावर चर्चा केली होती. आज उपमहापौर आले आहेत अधिका-याने गुन्हा दाखल केला. त्याला भंगी असे शब्द वापरले गेले ते किती खर आहे. किती खोट आहे त्याचा आपण खुलासा करावा.

**प्रभात पाटील :-**

आपण खुलासा जरुर करा. संबंधीत अधिकारी आहेत त्यांना सुद्धा बोलवा. आयुक्त साहेब, तुम्हाला विनंती आहे. तुम्ही माहिती घ्या सर्व सभागृहाला माहिती मिळेल. अधिकारी प्रिंट मिडीयाला मुलाखती देतात कोणी इलेक्ट्रॉनिक...........

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मला ह्या विषयावर बोलायचं नाही.

**प्रभात पाटील :-**

अधिका-यांना बोलवा आणि त्याच्याकडुन माहिती घ्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

कोणावरही केस करताना त्यांनी आयुक्तांशी चर्चा केली का? सभागृहातील सदस्यांवर किंवा कोणावरही चर्चा करताना ह्या शहरातील एक कर्मचारी ह्याने मा. आयुक्तांची परवानगी घ्यायला पाहिजे. मा. आयुक्तांनी माहिती द्यायला पाहिजे मी माहिती देतो त्यांना काय माहिती.

**नरेंद्र मेहता :-**

मला ते सांगतील.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुम्ही पेपरची बातमी वाचता पेपरला तुमच्या बातम्या ब-याच येतात.

**नरेंद्र मेहता :-**

मी आरोप केला नाही मी माहिती मागितली. त्यांना माहिती द्या ते मला देतील.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मा. आयुक्त साहेब हायकोर्टाचा नियम आहे. हायकोर्टाने ज्या ज्या प्रभाग अधिका-याच्या कक्षेमध्ये अनाधिकृत बांधकाम होतील त्याला प्रभाग अधिकारी जबाबदार राहील असा आदेश दिलेला आहे. ह्या व्यक्तीला अनेक वेळा अनाधिकृत बांधकामाविषयी सांगुन देखील एकही बांधकामावर हा कारवाई करत नाही. कारण हा तिकडे प्रचंड भ्रष्टाचार करतो. हा पैसे खाण्याशिवाय दुसरा कुठलाही व्यवहार करत नाही. ह्या प्रभाग अधिका-याला माजी आयुक्त शिवमुर्ती नाईक ह्यांना सांगुन मीच तिकडे आणलेलं आहे. एक महिन्यापूर्वी मीच मागणी केली. उपायुक्तांनी मी १५ दिवसापूर्वी सांगितलं ह्या अधिका-याला इकडे थांबवू नका ह्याच्या तोंडावरची माशी उडत नाही. नवघर गावेदवी मंदीराजवळ एक घर दुरुस्तीची परवानगी घेऊन एक माळा वाढलेला आहे. ह्यांना गावक-यांनी आणि मी स्वतः सांगितलं परंतु ह्याने हालचाल केली नाही. असे बिनकामाचे अधिकारी ह्या शहरामध्ये आहेत. हा काय सांगणार मला मी काय बोललो त्याला. जर बोललो असले तर त्याने सांगाव मी त्याच्याकडे पैशाची मागणी केली होती.

**प्रशांत पालांडे :-**

आयुक्त साहेब ह्या विषयावर प्रशासनाने स्पष्टीकरण द्यायला पाहीजे.

**नयना म्हात्रे :-**

आयुक्ताच्या परवानगीने बोलते. सगळे प्रभाग अधिकारी आहेत. पण आमचा प्रभाग अधिकारी कुठे गेला आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मी जेव्हा माजी आयुक्तांना बोललो की, साहेब ह्यांना बदला. तर ते बोलले की डेप्युटेशनवर पाच अधिकारी आणण्यासाठी आम्हाला परवानगी द्या.

**भगवती शर्मा :-**

महापौर साहेब, पिछले टाईमभी ऐसा ही हुआ। सभा का समय फालतू जा रहा है। लक्षवेधीपे चर्चा किया जाए। सचिव साहब आप आदेश दिजीए।

**प्रशांत पालांडे :-**

आयुक्त साहेब आपण स्पष्टीकरण कराव. एखादा अधिकारी उपमहापौरावर कारवाई करत असेल तर सभागृहाला कळल पाहीजे.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब, सचिव साहेबांनी लक्षवेधी संपूर्ण सभागृहाला वाचून दाखवली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

विषय चालू आहे. आयुक्त साहेब त्याच्यावर बोलतात.

**अनिल सावंत :-**

ते अधिका-यांना बोलवतील आणि चर्चा होईल.

**मा. महापौर :-**

काय विषय जो झालेला आहे. मला सुध्दा माहीत नाही. तुम्ही संबंधित अधिका-यांना बोलवून आणि आयुक्तांना देखील बोलवून त्याचा खुलासा करतो.

**वंदना पाटील –**

महापौर साहेब, मी सभापती असताना मला चार महिन्यात ऐकदा सुध्दा पण भेटले नाही. आणि मी आयुक्ताकडे जाऊन त्यांची बदली केली आहे. म्हणून हा अधिकारी कामाचा नाही त्याला तुम्ही संस्पेड करा अस मी सांगते.

**प्रशांत पालांडे :-**

सभागृहाला कळू द्या. नक्की काय प्रकार झाला. प्रशासनाने माहीती दिली पाहीजे. घटना कधी घडली.

**मा. महापौर :-**

त्या अधिका-याला आणि मा. आयुक्तांना बोलवून चर्चा करतो.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही त्यांना बोलवणार. त्याच्यात मी आणखी एक मुद्दा सांगते. मागचे आयुक्त गेल्यावर ज्याच्याकडे पदभार होता. त्यावेळेला एक प्रकरण झालेले होत त्याचे इफेक्ट इस्ट आणि वेस्ट दोन्ही भागात पडले होते. मी महापालिकेकडून एक माहीती मागवली होती की, शहरामध्ये पावसाळ्यासाठी वेदर शेड शहरामध्ये किती घातल्या किती जणांनी अधिकृत घातल्या किती जणानी परवानग्या न घेता घातल्या त्याची माहीती मागवली होती. नगररचनाने ते पत्र प्रत्येक प्रभाग अधिका-याला डायवर्ट केल की तुम्ही प्रभात ताईना माहीती द्यावी. ह्या माणसाने कोणाला न विचारता ज्या बिल्डींगमध्ये वेदरशेड टाकल्या होत्या. ज्यांनी परवानग्या घेऊन टाकल्या होत्या. त्यांना आणि परवानगी न घेता टाकल्या त्या सर्वांना ह्याने परस्पर नोटीसा जाहीर केल्या. संपूर्ण पूर्व भागामध्ये गोंधळ झाला होता. आणि माझे नाव सांगितले की प्रभात पाटील ह्यांची तक्रार आहे. महापौरानी माझ्याशी ह्या विषयावर फोनवरून संपर्क केला होता. हा नगरसेवक म्हणून माझा आणि ह्या बॉडीचा प्रचंड अपमान होतो. कोणाचीही लेखी परवानगी न घेता काहीही शहानिशा न करता १५ दिवस ह्या माणसाने धुडगुस घातला होता. लोकांचे मोर्चे नगरसेवकाकडे आले. आणि प्रत्येक नगरसेवकांनी मला विचारल की तुम्ही अस का केल. मला फक्त माहीती हवी होती. असा गोंधळ घालणारा अधिकारी ह्याची बदली करा अस मी आपल्याला पत्र दिल आहे. ह्याची कारवाई करा आणि हा मुद्दा नजरेसमोर ठेवा. अशी माझी तुम्हाला विनंती आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब सचिव साहेबांनी लक्षवेधी वाचली आहे. ज्या-ज्या वेळेला लक्षवेधी येतात. त्या-त्या वेळेला गोंधळ होतो. माझी सदस्यांना विनंती आहे की, एखादी लक्षवेधी वाचल्यानंतर सदस्यांना वाटत असेल की ती सर्व सदस्यांना कळली पाहीजे, पत्रकाराना कळली पाहिजे. तर त्यांनी एक-एक झेरोक्स काढून ती द्यावी. त्यामुळे त्याच सर्वांना नॉलेज होईल. मा. महापौर साहेब, माझी परिवहन सेवेबद्दल लक्षवेधी आहे. ११ ऑगस्ट २०१० रोजी महासभेने ठराव केला. आणि जो सर्वानुमते पास झाला. या शहरामध्ये चांगली बससेवा परिवहन सेवा लोकांना देण्यात यावी. त्यानंतर स्टॅंडिंग कमिटीने ५ ऑगस्ट रोजी त्याला मान्यता दिली. ऑनलाईन टेंडर कॉल गेले. टेंडर आले टेंडर फायनल झाले. ८ ऑक्टोंबर २०१० रोजी त्या ठेकेदारा बरोबर करारनामा झाला. त्या करारनाम्यानुसार आणि महासभेच्या झालेल्या ठरावानुसार ज्या अटीशर्ती होत्या त्यांनी २५० बसची सेवा या शहरामध्ये सुरू करणे गरजेच होत. करारनामा झाल्यानंतर आज ह्या गोष्टीला १० महीने झाले. १० महिन्यामध्ये शहरात ६० बसेस ह्या नविन ठेकेदारांच्या चाललेल्या आहेत. महापालिकेतील लोकांना जी सेवा देण्याची इच्छा जनरल बॉडीची होती. ती पूर्ण झाली नाही. इतर शहरामधील बसेस ह्या शहरामध्ये आल्यामुळे त्या रूटवरून महापालिकेला जे उत्पन्न होणार होत त्या उत्पन्नातील घट झालेली आहे. आणि माझ्या लक्षवेधीमध्ये मी काही माहीती त्याच्याकडून मागवली होती ती मला मिळाली नाही. आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे. कारण ही लक्षवेधी मी लवकर संपवणार आहे. ही माहीती आपण द्या. आणि चांगली बस सेवा परिवहन सेवा ह्या शहरामध्ये कशी निर्माण होईल. कारण ह्या शहरामध्ये मीटरप्रमाणे रिक्षा नसल्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करायला लागतो. परिवहन सेवेमध्ये आपण ५० मिनी बसेस घेणार होतो. काही ठिकाणी रस्ते अरूंद असल्यामुळे उदा. शांती नगर, सृष्टी एरिया आणि भाईंदर पूर्व एरिया आहे.

तिथे त्या ५० मिनी बस पुरल्या असत्या. त्याच्यात ८० बसेस ह्या अे.सी. होत्या. आपण मुंबई पर्यंत सेवा पुरविता आली असती. ह्या गोष्टीची तुम्ही माहीती घ्या. आणि कशाप्रकारे ही सेवा लवकरात लवकर सुरळीत चालेल ते बघा. आणि ह्याच परिवहन सेवेबद्दल १३ जून २०११ रोजी सकाळी ७.३० वाजता परिवहन बसने मिरारोडच्या शितल नगर येथे सुरेंद्र पुजारी हा रस्त्याने चालत होता. त्याला उडवल. तो कुठच्याही गाडीवर नव्हत. पेपर घेत होता. तेव्हा त्यावेळी त्या कॉर्नरला बसने उडवल. आणि बस ड्रायव्हर पळून गेला. स्थानिक लोकांनी त्याला प्रायव्हेट बसमध्ये ॲडमिट केल. प्रायव्हेट हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केल्यानंतर तिथे उपचार होऊ शकत नाही. म्हणून त्यांना मिरारोडच्या मोठ्या हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केल. त्यानंतर त्यांची १५ जूनला सुरेंद्र पुजारीची डेथ झाली. ही गोष्ट आमच्याकडे आल्यानंतर आज २९ जुले म्हणजे दिड महिना झाला. ह्या दिड महीन्यामध्ये आपल्या पालिकेचा कर्मचारी किंवा परिवहन समितीचा कर्मचारी किंवा ठेकेदार ह्या तिघापैकी कोणी मदत करायची सोडाच पण त्या कुटूंबाची विचारपूस करायला गेले नाही की काय परिस्थीती आहे. ते एकटे कमावणारे होते. त्याची तीन मुल शिक्षण घेतात. त्याची पत्नी हाऊस वाईफ आहे. आणि ती कुठच्याही प्रकारच काम करत नाही. ती बाई मा. महापौरांकडे आली होती. हॉस्पीटलच दिड लाख खर्च झाला. दिड लाख भरण्यासाठी त्या बाईने दागिने गहाण ठेवले आणि मग बॉडी हातात घेतली. आज ते कुटूंब वाऱ्यावर पडले आहे. बेसहारा झाले आहे. अशा ह्या गोष्टी निर्दशनास आलेल्या आहेत. आज परिवहनमध्ये जे ड्रायव्हर भरती केलेले आहेत की ॲक्सीडन्ट झाल्यानंतर परिवहन सेवेलाच माहीत नसते ही गोष्ट त्याच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी चौकशी सुरू केली. नंतर ते बोलले की पोलिस कम्पलेन्ट झालेली आहे. त्या बाईला आपल्या परिवहन सेवेमध्ये जे काही काम असेल त्याच्यात सामावून घ्या. आणि त्या कुटूंबाला महापालिकेकडून आणि परिवहन ठेकेदाराकडून मदत द्यावी एवढीच माझी लक्षवेधी आहे. धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर साहेब परवानगी द्याल का?

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब माझ्या लक्षवेधीवर तुम्हाला इतराना बोलायला परवानगी द्यायची असेल. कारण माझ्या लक्षवेधीची सर्व मते आलेली आहेत. माझी लक्षवेधी संपली आहे. महापौर साहेब आपण रूलिंग द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या विषयावर आम्हाला बोलायच आहे. हा सभागृहाचा विभाग झाला.

**अनिल सावंत :-**

त्यांनी वेगळी लक्षवेधी टाकावी.

**मा. महापौर :-**

दुसऱ्याच्या विषयावर आपण बोलू शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हा सभागृहातला विषय झाला. आमच्या सुचना घेणार नाही का? ह्या सदस्याना लक्षवेधी मांडायचा अधिकार नाही. कारण ती कमिटी त्यांच्या अंडरमध्ये आहे. राष्ट्रवादी आणि कॉंग्रेसचे सदस्य त्या कमिटीवर आहेत.

**अनिल सावंत :-**

त्यांना माहीतच नाही की कमिटी डिझोल्व्ह झाली आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला दोन-अडीज करोड अनुदान दिलेल आहे. आता पर्यंत महापालिका लॉस मध्ये चालली आहे. ह्या दोन्ही पक्षाकडे कमिटी असताना शहरातली लोक सहन करतात हे ह्या दोन पक्षाच पाप आहे. कमिटी आणि सभापती त्यांच्याकडे आहे.

**भगवती शर्मा :-**

त्यांनी जे पक्षाचे नाव घेतले ते काढून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची कमिटी आहे ते सदस्य आणि सभापती काय करतात. तुमचे सदस्य बोलतात ते महापौरांना कळल नाही. मग कमिटी काय करते. मा. आयुक्तांना ठराव पाठवायच काम कमिटीच आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही खाली बसा. तुम्ही खूप बेशिस्त वागता.

**मिलन म्हात्रे :-**

शिस्तीच्या गोष्टी करू नका.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब परिवहन समिती अस्तित्वात आहे का?

**(सभागृहात गोंधळ )**

**मिलन म्हात्रे :-**

ह्या लक्षवेधीवर आम्ही आमचे विचार मांडायचे नाहीत का? ह्या मस्टरवर आमच्या सह्या कशाला घेता?

**मा. महापौर :-**

पहिल्यांदा त्यांच्या लक्षवेधीवर त्यांचे विचार मांडू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

लक्षवेधीवर तुमचे सदस्य बोलले त्यांना पण तोच न्याय लावा.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब, तुम्ही रूलिंग द्या.

**(सभागृहात गोंधळ )**

**मा. महापौर :-**

सुरेंद्र पुजारी ह्यांचा मृत्यू झाला आहे. त्याविषयी आम्ही सखोल चौकशी करून त्याची माहीती घेऊन संबंधीत ठेकेदारांना बोलवून...............

**मिलन म्हात्रे :-**

परिवहन सेवेचे ठराव मागवा. परिवहन सेवेला काय-काय लागल ते मागवा.

**मा.महापौर :-**

त्या महिलेला कामाला ठेवतो. आणि थोडाफार खर्चही देतो अस त्यांनी मला लेखी दिलेल आहे.

**मिलन म्हात्रे :-**

लक्षवेधीवर जो परिवहन सेवेचा अधिकारी होता तो खुलासा का करत नाही. जे प्रकरण झाल त्याच्यात अधिका-याचा खुलासा करायला सांगितलाना. परिवहनचा जो प्रमुख आहे. त्यांनी लक्षवेधीवर खुलासा करावा.

**प्रशांत पालांडे :-**

महापौरांनी ह्या लक्षवेधीवर काय रूलिंग दिली ते ऐकायला आल नाही. महापौर साहेब एक विनंती आहे. एखाद्या विषयावर कमीत कमी गटनेत्याला तरी बोलायला संधी द्यायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

महापौराच्या इकडे आमच्या बैठका व्हायच्या त्या तुम्ही लोकांनी बंद केल्या.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांचा जर विरोध नसेल तर बोलायला हरकत नाही.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी त्यांची आहे तर त्यांना बोलायला देणार की तुम्हाला देणार? त्यांचा विरोध नाही. परंतु मी पिठासीन अधिकारी म्हणून सांगतो.

**प्रशांत पालांडे :-**

परत एकदा ती रूलिंग वाचून दाखवा.

**नगरसचिव :-**

मा. महापौरानी दिलेल्या रूलिंगच वाचन केले. दिनांक १३ जून २०११ रोजी परिवहन बस अपघातात मृत्यू पावलेले श्री. सुरेंद्र पुजारी ह्यांना दिड लाख हॉस्पीटल मध्ये झालेला खर्च व दोन लाख रू. नुकसान भरपाई व त्यांच्या पत्नीला परिवहन सेवेमध्ये नोकरी ठेकेदारांनी द्यावी असा मी आदेश देत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, हा सभागृहाकडून मांडला पाहीजे की, महापौरानी द्यायला पाहीजे.

**मा. महापौर :-**

मी एकदा वाचल ना.

**नरेंद्र मेहता :-**

आता ते सांगा त्याला अनुमती कशी द्यायची.

**मा. महापौर :-**

मी एकदा वाचल १० वेळा वाचू का?

**नरेंद्र मेहता :-**

अधिकार नाही द्यायचा. आम्ही मांडल्यानंतर आम्ही बोलणारच मग तुम्ही डायरेक्ट देणार कस चालणार ते.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये माझी सुचना घ्या.

**भगवती शर्मा :-**

महापौर साहेब लक्षवेधी में कोई ठराव नही होता है। लक्षवेधी में महापौर का आदेश होता है।

**(सभागृहात गोंधळ)**

**अनिल सावंत :-**

महापौर रूलिंग देतात.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, तुमच जे रूलिंग झाल आहे. त्याच्यात त्या गाडीची ॲक्सीडेन्टल पॉलिसी असणार. पोलिस केस झाली असणार.

**मा. महापौर :-**

तो इन्क्वायरी करणार.

**मिलन म्हात्रे :-**

ते तुमच्या रूलिंगमध्ये आल पाहीजे. ॲक्सीडेन्टल पॉलिसीमध्ये जो इफेक्ट पर्सन आहे त्याला जी काय रक्कम आहे ती त्याच्याकडून द्यायची आहे. ते तुमच्या रूलिंगमध्ये आलेल नाही.

**नगरसचिव :-**

दि. १४/०९/२०१०, दि. २९/०९/२०१० (दि. १४/०९/२०१० ची तहकुब सभा), १२/११/२०१० व ०२/१२/२०१० रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, पहिल्या पानावर माझा आक्षेप आहे. ह्या ठिकाणी तुमची जी विषयपत्रिका आहे, आयुक्त साहेब, सगळ्यात महत्वाची बाब आहे की, गेल्या अनेक महीने आणि वर्षापासून हेच चालल आहे. तुमच्या मुळ विषयपत्रिकेचा विषय ४० आहे. ३९ तुमचा इतिवृत्तांला कायम करणे. त्याच्या खाली जो तुमचा सिक्वेन्स आहे तो चुकलेला आहे. शासकिय किंवा शासनाकडील, शासकिय अधिकाऱ्याची पत्र हा सिरियल नंबर १२ जो मी मांडला आहे. आणि १३ समित्याचे आणि उपसमित्याचे ठराव निरंक हा १३ आहे. तुमचा जो ४० नंबरचा विषय आहे. ह्या विषयाच्या वरती ते पाहीजे. आता त्याच्यामध्ये शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्याकडील पत्रे ही निरंक की सरंक ते मला सांगा.

**नगरसचिव :-**

तो खालच्या विषयाचा निरंक आहे. पत्राना निरंक नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्ही पत्र कुठे सबमिट केली.

**नगरसचिव :-**

मागच्या सभेत दिली ना.

**मिलन म्हात्रे :-**

ती पत्र आली पाहीजेत.

**नगरसचिव :-**

पहीली सभा होती त्या दिवशी दिली ना.

**मिलन म्हात्रे :-**

मी आदल्या दिवशी भेटलो. आणि विचारल. आता ह्याच्यामध्ये आमच्या नगरसेवकांना माहीती होण्यासारखे अनेक जी.आर. आहेत. हे जे कर्मचारी आहेत त्याच्या भविष्य निर्वाह निधी रिटायर्डमेन्ट नंतरच सगळ. आणि अत्यंत महत्वाच म्हणजे आपल्या महाराष्ट्र राज्य शासनाच्या चिफ सेक्रेटरीच पत्र ह्यामध्ये लावलेल आहे. त्याची तारीख आणि त्याच्यावर त्यांनी आयुक्तांना मार्क केल आहे. दि. २६/०५/२०११ ह्याच्यातल्या काही गाईडलाईन्स आहेत. ह्याच्यावर जे कव्हरींग लेटर आहे त्याच्यावर आऊटवर्ड इनवर्ड नाही. ह्याचे मालक तुम्ही आहात. तुम्ही सगळ्यांकडून मागवून घ्यायचे. कोणी देत नसेल तर ह्याची तक्रार आयुक्ताकडे तक्रार करुन त्याच्यावर कारवाई करायची. ॲक्टच्या तरतुदीनुसार आज या गाईडलाइन नुसार हे स्पष्ट हाताने लिहिल आहे. दि. म्युनिसिपल कमिशनर मिरा-भाईंदर म्युनिसिपल कॉर्पोरेशन डिस्ट्रीक्ट ठाणे, आणि हे २६ मे च पत्र ७ महिन्यामध्ये आम्हाला टेंडर केले जाते. हे जी.आर. आहेत. ही अत्यंत गंभीर बाब अशी आहे की एखादे कायदे गव्हर्रमेन्ट बनवते म्हणजे गर्भलिंग चिकित्सा हे तुम्हाला कळवते म्हणजे तुम्हाला कळलेले आहे आणि त्यानंतर हे वाद ग्रस्त विषय ह्या सभागृहामध्ये येतात. स्थायी समितीच्या सभागृहामध्ये येतात, सदस्यांना तुमच्या अक्षम्य चूकीमुळे जे कायदे पारित होतात आणि कळवले जातात. त्या कायद्याच्या प्रती आयुक्त कार्यालयात सूद्धा जात नाहीत. सभागृहापूढे आणले जात नाही. त्याच्यात आम्हाला फरफटत जावे लागते. तुम्ही चूक झाली म्हणून चालत नाही.

**नगरसचिव :-**

साहेब चूक माझी नाही.

**मिलन म्हात्रे :-**

चूक कोणाचीही असो. तुम्ही मालक आहात. तुम्ही मागवून घ्यायच आहे.

**नगरसचिव :-**

मी प्रशासनाकडून मागवून घेतली.

**मिलन म्हात्रे :-**

एवढे महिने गेले कसे? तुमची १०-१० महिने वर्षाची प्रोसिडींग मंजूरीला येत नाही. ती ही मागवता का?

**नगरसचिव :-**

प्रत्येक सभेला दिली जाते.

**मिलन म्हात्रे :-**

सर्व सदस्यांना एक-एक वर्षानंतरची प्रोसिडिंग पाठवता कायद्यात तरतूद आहे. फार तर एक महिना तुम्हाला काय त्रास आहे. ह्या कायद्याच्या तरतूदीनूसार तुम्हाला वागायच नाही का?

**नगरसचिव :-**

वागायच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुमच्या प्रोसिडिंग येत का नाही.

**नगरसचिव :-**

प्रोसिडिंग प्रत्येक महिन्याला दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

खोट कशाला बोलता. आता ही प्रोसिडिंग कोणत्या महिन्याची आहे.

**नगरसचिव :-**

ही नवव्या महिन्याची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

का नवव्या महिन्याची ? नववा महिना म्हणजे कूठला येता की गेलेला?

**नगरसचिव :-**

गेलेला.

**मिलन म्हात्रे :-**

८-८, ९-९ महिने तुमच्या प्रोसिडिंग येत नाही. तूमच्याकडे स्टाफ कमी आहे का?

**नगरसचिव :-**

स्टेनो कमी आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, ह्या महत्वाच्या बाबी आहेत. ही प्रशासकीय बाब आहे. ही आलेली महत्वाची पत्रक तुमच्या ऑफिसला सूद्धा जात नाहीत. विभागीय स्तरावर वाटली जात नाहीत. अधिकारी वर्ग सचिवांना आणून देत नाहीत. सचिव आमच्या लोक प्रतिनिधीना देत नाहीत. याच्यात अनेक प्लास्टीकचे कायदे आहेत, फटाक्याचे कायदे आहेत. ध्वनीप्रदुषणाचे कायदे आहेत या सगळ्यांची अंमलबजावणी ह्या सभागृहामध्ये आम्ही करायची आहे आणि ठराव पारीत करुन त्याच कायद्यामध्ये रुपांतर करायचं आहे. असं असताना सुद्धा मला तर वाटत नाही सचिवांनी हे वाचले असेल.

**नगरसचिव :-**

वाचलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही वाचलेले असुन सुद्धा अनेक कायदे आहेत, जी.आर. पाठवले आहेत ह्याचे घ्यायचे त्याचे विषय तुम्हाला सभागृहापुढे घेता आले नाही का?

**नगरसचिव :-**

मी कसं घेणार ते प्रशासन घेईल ना.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, तुमच्याकडे ही विषयपत्रिका आली. जी.आर. आले. तर तुमचं पहिल काम काय आहे. आयुक्तांना कळविणे त्या डिपार्टमेंटने कळवू दे न कळवू दे ते सोडुन द्या.

**नगरसचिव :-**

त्यांना सुद्धा त्याचा सेट दिला जातो.

**मिलन म्हात्रे :-**

कायद्यानुसार प्रस्ताव कोणी पाठवायचे नियमानूसार आयुक्त कार्यालयातून सहीचे प्रस्ताव गेले पाहिजेत. तुम्ही जर आयुक्त कार्यालयाला कागदपत्र पाठवले नाहीत किंवा डिपार्टमेंटस्च्या अधिका-याने पाठवले नाहीत तर महासभेपुढे आयुक्त हा प्रस्ताव पाठवू शकतो का?

**नगरसचिव :-**

परिपत्रक हा माझा विषय नाही. प्रशासनाकडुन परिपत्रक स्विकारली जातात. त्यांच्याकडुन आल्यानंतर आपल्याकडे पाठवतो.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्याकडुन मागवून घेणे हे तुमचं काम आहे.

**नगरसचिव :-**

त्यांना हे पत्र दिलेल आहे. लेखी खुलासा मागितलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे तुमच काम आहे. माझ्या माहीतीनुसार ही पहिली नोटीस पाठवली आहे.

**नगरसचिव :-**

ह्याच्या अगोदर दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या अगोदर ३-३, ४-४ महिन्याची का आली नाहीत.

**नगरसचिव :-**

सामान्य प्रशासनाला विचारायला लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, ह्याच्यावर तुम्ही गांभिर्याने निर्णय घ्या. मी तुम्हाला भेटून सुचना केल्या. त्याच्यावर लवकरात लवकर रिझल्ट द्या. कारण आम्हाला ह्यापुढे असे सभागृह चालवायचे नाही. कारण जे काही ठराव पास होतात. आम्ही त्याच्यात अधिकृत नसतो. सदस्यानी हा सगळा सेट वाचावा. त्याच्यात अत्यंत महत्वाची माहीती दिलेली आहे. त्यावर्षी चार-चार, पाच-पाच महिन्याचे ठराव आपण केलेले नाहीत. माझी ही सुचना नोंद करून घ्यायची. ह्या सुचनेला अधिन राहून इतिवृत्तांतला मान्यता द्यायची आहे.

**उमा सपार :-**

सचिव साहेब ४५ पानावरती ५२ नंबर वॉर्ड करा. १२ नंबर केलेल आहे. तिकडे ५२ नंबर करा.

**मिलन म्हात्रे :-**

९ व्या महिन्यात काय झाले ते आता आम्हाला काय कळणार.

**प्रभात पाटील :-**

दि. १४/०९/२०१०, दि. २९/०९/२०१० (दि. १४/०९/२०१० ची तहकुब सभा), १२/११/२०१० व ०२/१२/२०१० रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

विषयपत्रिका संपवा. त्यानंतर सदस्यांना बोलायला वेळ द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, यापूर्वी जी.आर. जे आले त्याबद्दल..........

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, अनुपालन अहवालावर चर्चा करायची आहे.

**नगरसचिव :-**

त्याच्यात एकच विषय आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मला त्याच्यावर बोलायच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नियम काय आहे. ठराव झाल्यावर त्याच्यावर चर्चा करतात. इतिवृत्तांताचा ठराव झाला. त्याच्यावर चर्चा होऊ द्या. नियमानुसार सभागृह चालवा.

**प्रशांत पालांडे :-**

महापौर साहेब २० जूनच्या महासभेमध्ये समाज विकास अधिकाऱ्याचा एक विषय चर्चेला घेतला होता. त्याच्याबद्दल आपण एक आदेश दिला होता. त्या समाजविकास अधिकाऱ्याला त्वरीत निलंबीत करा असा आदेश प्रशासनाला दिला होता. त्या आदेशाच काय झाल हे विचारायच होत.

**मा. महापौर :-**

माहीती घेऊन असे बोललो होतो.

**प्रशांत पालांडे :-**

तुम्ही आदेशच दिला होता. महापौर साहेब त्यावेळेला सस्पेंड केल होत. त्याच काय झाल प्रशासनाने उत्तर द्याव.

**जुबेर ईनामदार :-**

अनुपालनामध्ये त्याचा कुठे येतो विषय.

**प्रशांत पालांडे :-**

जुबेरजी अनुपालनमध्ये येतो.

**मा. महापौर :-**

चौकशी करून मग माहीती देतो.

**प्रशांत पालांडे :-**

आता त्याला दोन महिने होत आले. प्रशासनाने काय कारवाई केली. त्याची माहीती प्रशासनाने द्यावी.

**मा. महापौर :-**

आजच माहीती देतो.

**प्रशांत पालांडे :-**

सभागृहाला माहीती कळू दे ना. सभागृहाच्या समोर तो आदेश दिला होता. त्या आदेशाच का झाल.

**मा. महापौर :-**

चौकशी करून आदेश देतो.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब तुम्ही स्पष्टपणे त्या अधिका-याला निलंबीत केले होते. आपल्याला हवे असेल तर इतिवृत्तांत बघा किंवा रेकॉर्ड चेक करा. तुम्ही स्पष्टपणे सांगितलं होतं की, त्या अधिका-याला पुढच्या महासभेपर्यंत निलंबीत करण्यात येईल. त्याच प्रशासनाने उत्तर द्यावं.

**मा. महापौर :-**

ते अधिकारी बाहेर जाणार होते त्यांना जाऊ नका असे मी सांगितले.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, ते नंतरच अगोदर तुम्ही निलंबीत केलं आणि नंतर ते फिरायला गेले. आयुक्त साहेब तुम्ही प्रशासनाच्या वतीने खुलासा करावा. सचिव साहेब, तसं नसेल तर इतिवृत्तांतामध्ये काय रेकॉर्ड आहे ते सांगा?

**नरेंद्र मेहता :-**

जे आम्हाला उत्तर देणार त्यांच्यावरच गुन्हा दाखल झाला आहे. त्यांचीच चौकशी करायची तर ते आम्हाला काय उत्तर देणार.

**मा. महापौर :-**

कोण?

**नरेंद्र मेहता :-**

उपायुक्त साहेब, त्याच्यावरच गुन्हा दाखल झाला आहे. त्यांचीच चौकशी व्हायची आहे.

**मा. महापौर :-**

असा कोणी गुन्हा दाखल.........

**नरेंद्र मेहता :-**

झालं ना कोर्टाने आदेश केला आहे. कोणी सामान्यांनी नाही तर कोर्टाने आदेश केला आहे की, गुन्हा दाखल करा. त्यांची चौकशी होणार ते दोषी असतील किंवा नाही. त्यांनीच उत्तर दिलेलं सभागृहाने ऐकायचं.

**मा. महापौर :-**

कोर्टाने लेखी आदेश दिला आहे का? की त्यांना सभागृहात बसवू नका.

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहात बसवायचं मी कूठे बोललो ह्या भरतीबाबतच्या संदर्भात त्यांची चौकशी व्हावी.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब, सभागृहाची दिशाभूल होते. कोर्टाने जो आदेश दिला आहे तो ह्या भरती संदर्भात नाही ती भरती वेगळी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सगळेच नाहीत.

**अनिल सावंत :-**

ते तुम्ही टी.व्ही. वर बघितलं सगळे आहेत. परंतु, तुम्ही सांगितलेलं खर होत नाही. ज्यांच्यावर जे आदेश झाले ते दुस-या भरती संदर्भात आहेत त्यांनी खुलासा करायला हरकत नाही समाज विकास अधिका-याबद्दल.

**प्रभात पाटील :-**

पिठासीन अधिकारी जर त्यांना बोलायला सांगत असतील तर त्यांना काहीच हरकत नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

महापौर साहेब, उपआयुक्तांवर जी कारवाई झाली असं ह्यांनी सांगितलं ह्या विषयावर सविस्तर माहिती त्यांनी स्टॅंडींगमध्ये दिली. ती माहिती ऐकल्यानंतर तो पटना युनिर्व्हसिटीचा दोष आहे. एखाद्या संस्थेने सर्टीफिकेट दिलं ते दोन वेळा बरोबर असे दिले आणि तिस-यांदा चुकीचे दिले असे.........

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही आज सिध्द करु की ते सर्टीफिकेट महापालिकेकडे पहिलं आलं आहे. साहेब आऊटवर्ड चौथ्या महीन्याचं आहे आणि तो आपल्याला तिसऱ्या महिन्यात उत्तर देतो.

**लक्ष्मण जंगम :-**

त्यांनी तशी व्यवस्थित माहिती दिलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

जंगम साहेब तो विषय वेगळा आहे.

**प्रभात पाटील :-**

राऊत साहेब खुलासा करा.

**सुधीर राऊत (उपायुक्त साो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, ३०/०६/२०११ च्या सभेमध्ये समाज विकास अधिकारी पदाकरीता जी भरती प्रक्रिया झाली होती आणि त्यांना नेमणूक देण्यात आली होती त्या संदर्भात काही कथीत गैरव्यवहार झाल्यासंबंधाने काही सदस्यांनी चौकशीची मागणी केली होती तेव्हा प्रभारी आयुक्त म्हणून मी सभागृहात बसलो होतो त्याचा चौकशी अहवाल मा. महापौरांकडे सादर करावा असा आदेश मा. पिठासीन अधिकाऱ्याने मला दिला होता. अशा तऱ्हेचा चौकशी अहवाल रितसर चौकशी करुन तो अहवाल मा. महापौरांकडे सादर करण्यात आलेला आहे. त्या अहवालानूसार जी काही कार्यवाही आहे ती मा. महापौरांच्या स्तरावर होणे अपेक्षित आहे आणि त्याबाबत चौकशी अहवाल आहे तो मा. महापौरांकडे सादर केला आहे असे निवेदन करु इच्छितो.

**प्रशांत पालांडे :-**

राऊत साहेब, त्यावेळेला मा. महापौरांनी स्पष्टपणे आदेश दिलेला होता की, त्या अधिकाऱ्यांस निलंबित करा आणि चौकशी करा आणि चौकशीचा अहवाल द्या सचिव साहेब, मा. महापौराचा काय आदेश होता ते आपल्याला कसं कळणार तो रेकॉर्ड मागवा. मा. महापौर साहेब, ह्या विषयाचं काय करायचं. समाज विकास अधिकाऱ्याचे पुढे काय? तुमच्याकडे अहवाल आला असे राऊत साहेब बोलतात.

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहात अहवाल वाचा तो सभागृहाचा विषय होता.

**आसिफ शेख :-**

तुम्ही मा. उपायुक्तांना, मा. आयुक्तांना खुलासा करायला सांगता परंतु हे संपूर्ण प्रकरण न्यायालयात असल्यामुळे आपण खुलासा करु शकत नाही ते योग्य नाही.

**नरेंद्र मेहता :-**

अनिल सावंत जी बोलले की, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही, दुसरें प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

**आसिफ शेख :-**

कोण काय बोललं ते महत्वाचं नाही. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे त्यांच्यावर चर्चा करण्याची आवश्यकता नाही आपल्यासाठी सुध्दा योग्य नाही आणि आमच्यासाठी योग्य नाही.

**नरेंद्र मेहता :-**

विरोधी पक्षनेताजी हे प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही ते चवाथे ह्यांचे न्यायप्रविष्ठ आहे त्यांचे न्यायप्रविष्ठ नाही.

**प्रशांत पालांडे :-**

महापौर साहेब, आपण काय करणार ते सभागृहाला तरी सांगा.

**मा. महापौर :-**

ऑफिसला आल्यावर दाखवतो.

**प्रकरण क्र. ३९ :-**

दि. १४/०९/२०१०, दि. २९/०९/२०१० (दि. १४/०९/२०१० ची तहकुब सभा), १२/११/२०१० व ०२/१२/२०१० रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४१ :-**

दि. १४/०९/२०१०, दि. २९/०९/२०१० (दि. १४/०९/२०१० ची तहकुब सभा), १२/११/२०१० व ०२/१२/२०१० रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४०, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आगरी समाज उन्नती संस्था - आ.क्र. १२२ ही जागा संस्थेस मिळणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर साहेब, तुम्ही मला कमांडोची भिती दाखवता का? मी बोलायला मागतो तुम्ही बोलायला देत नाही तुम्ही सांगता बाहेर काढीन काढुन टाका.

**मा. महापौर :-**

खाली बसा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महासभेत बोलायचा अधिकार आहे. एक गटनेता म्हणून बोलतो. कमांडोला बोलवा आणि बाहेर काढुन टाका. मी अर्ध्या तासापासून रिक्वेस्ट करतो आणि तुम्ही मला बोलायलाच देत नाही. तुम्ही मला भिती दाखवता का?

**मा. महापौर :-**

मी तुम्हाला भिती दाखवत नाही आम्हाला भिती दाखवायची गरज नाही.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, महापौरांनी जो विषय आणला आहे त्याचं स्वागत करतो. सचिव ज्यांनी शिफारस केली त्यांनीच विषय आणला म्हणून मी बोलतो.

**अनिल सावंत :-**

सभा शास्त्राप्रमाणे सभा चालली पाहिजे ठराव होऊ द्या मग बोला.

**एस. ए. खान :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आगरी समाज उन्नती संस्था, यांनी विकास आराखड्यातील आ.क्र.१२२ ही जागा संस्थेसाठी मागणी केलेली आहे.

मागणी केलेली जागा सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा व शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक असल्याचे संस्थेने अर्जात नमूद केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. १२२ हे आरक्षण "Play Ground & Social Forestry" (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या नावाने प्रस्ताविक असून आरक्षणाखालील क्षेत्र ४६७००.०० चौ.मी. आहे. यापैकी ३०५३३.६० चौ.मी. महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

आगरी समाज उन्नती समाज संस्थेस जागा देण्याबाबत (१) मा. श्री. तुळशीदास म्हात्रे, महापौर, (२) मा. आ. श्री. गिल्बर्ट मेन्डोन्सा, (३) मा. खा.डॉ. संजीव नाईक, (४) मा. श्री. मुझफ्फर हुसैन, माजी आमदार, (५) मा. श्री. जगन्नाथ पाटील, माजी खासदार, (६) मा. आ. श्री. रामनाथ मोते या लोकप्रतिनिधींनी शिफारस केलेली आहे.

मागणी केलेली जागा ही खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या वापरासाठी असल्यामुळे खेळाचे मैदान हे सार्वजनिक वापरासाठी सर्वांसाठी खुले ठेवण्यात यावे व अनुज्ञेय होणारे बांधकाम क्षेत्राचा वापर संस्थेने करावा. तसेच खेळाचे उपक्रमासाठी आवश्यकतेप्रमाणे नियमानुसार पूर्वमंजूरी घेवून बांधकाम करणे आवश्यक राहील.

संस्था वापर करण्या-या बांधकाम क्षेत्रासाठी आवश्यक असणा-या भूखंड क्षेत्राचे भाडे संस्थेकडून प्रचलित नियमावलीनुसार वसूल करावे लागेल. तसेच खेळाचे मैदानाची देखभाल व दुरुस्ती संस्थेने विनाअट करणे बंधनकारक राहील.

आरक्षणाखालील जागेत नियमानुसार अनुज्ञेय होणारे बांधकाम करण्यासाठी होणारा खर्च संस्थेस करावा लागेल.

आगरी समाज उन्नती संस्था यांना आ.क्र.१२२ मधील महानगरपालिकेच्या ताब्यातील जागेपैकी दोन एकर जागा (मैदान व सामाजिक वनीकरणाची जागेमधून क्षेत्र निश्चित करुन) ३० वर्षासाठी भाड्याने देण्यास ही सभा मान्यता देत आहे. महानगरपालिकेने ह्या समाजास दिलेली जागा रिमार्केशन करुन द्यावी.

सदर जागेचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) नुसार भाडे प्रशासनाने ठरवून त्यात प्रत्येक ५ वर्षांत १०% वाढ करण्यात यावी. हा प्रस्ताव शासनाकडे पाठवून प्रस्ताव मान्य झाल्यावर भूखंडाचा ताबा दिल्यापासून भाडे आकारण्यात यावे. सदर भूखंडावर नियमानुसार अनुज्ञेय बांधकाम करण्याची परवानगी देण्यात यावी. सदर भूखंडाबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार ही सभा मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, आमचे निवेदन आहे की ठरावात आमचे सन्मा. सदस्य शरद पाटील आहेत ते सभागृहात उपस्थित नाहीत त्यांची नोंद घ्यावी.

**अनिल सावंत :-**

त्यांचा ह्या ठरावाला विरोध आहे असे तुम्हाला बोलायचं आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

मला तसे नाही बोलायचे मी विरोध बोललो का? उगाच विषय डायवर्ट करायचा. आमची काही सुचना आहे का?

**भगवती शर्मा :-**

आम्हाला कोणाचीच सुचना घ्यायची नाही तुम्ही दुसरा ठराव मांडा.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, जो विषय आहे त्या विषयावर आम्हाला बोलायचा अधिकार आहे. सुचना घेऊ नका आम्हाला जे सांगायचं ते आम्ही सांगितलं आहे.

**आसिफ शेख :-**

तुमचा विरोध आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही विरोध कुठे बोलतो. मागच्या वेळेला अभिनव शिक्षण संस्थेच्या शिक्षणाचा विषय होता. त्यावेळेला मा. महापौर साहेब बाहेर गेले होते त्यावेळेला विरोध होता का? मा. महापौर साहेब, आपण जो विषय आणला आहे त्याचा आम्ही सम्मान करतो. मिरा भाईंदर महापालिकेने या शहराची काळजी घेतली आणि ह्या आगरी समाजातून शहर निर्माण झाले त्यांना जागा देण्याचा निर्णय घेतला त्याच आमच्या भाजपाद्वारे स्वागत करतो ती जागा त्यांना द्यावी. त्याबद्दल आमचे काही दुमत नाही आम्ही त्याला अनुमोदन देतो.

**मा. महापौर :-**

आम्हाला ह्या विषयावर कोणाची सुचना घ्यायची नाही. आम्हाला सर्व समाजाला सांभाळून घ्यायचं आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला बोलून चालणार नाही. तो सभागृहाचा अधिकार आहे. तुम्ही सांगु शकत नाही की सुचना घ्यायची नाही सचिव साहेब, ह्यामध्ये आमची सुचना आहे आणि सुचना घ्यायला बंधनकारक आहे त्यात आम्हाला नाही सांगु शकत नाही.

**अनिल सावंत :-**

ठराव करा. सुचना बंधनकारक होऊ शकत नाही ठराव करा.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही फेटाळा ना. आम्हाला मांडायला अधिकार आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात अनेक जाती जमातीची लोक राहतात.

**प्रभात पाटील :-**

आता जो ठराव झाला त्याच्यात तुम्हाला प्रशासकीयदृष्ट्या काय अडचण वाटते का? आताच क्लीअर करा.

**दिपक खांबित :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, हे जे रिझर्व्हेशन आहे ते सामाजिक वनीकरण आणि खेळाच्या मैदानासाठी आहे. तुम्ही जी दोन एकर जागा म्हणता त्या दोन एकर जागेचा फेरबदलाचा प्रस्ताव आपल्याला पाठवून मंजूर करुन घ्यावा लागेल.

**शशिकांत भोईर :-**

३७/१ खाली त्याला समाविष्ठ करा.

**दिपक खांबित :-**

३७ खाली तुम्हाला ती घालावी लागेल.

**अनिल सावंत :-**

शशिकांत भोईर ची सुचना घ्या.

**शशिकांत भोईर :-**

महाराष्ट्र नगररचना १९६५ अन्वये ३७/१ खाली हा प्रस्ताव फेर बदलासाठी पाठवावा अशी मी सुचना मांडत आहे.

**दिपक खांबित :-**

फेरबदल झाल्यानंतर तो विषय गव्हर्नमेंटकडे पाठवावा लागेल.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, आमची त्या ठरावामध्ये सुचना घ्यावी आम्ही सभागृहाचं स्वागत केलं आहे आणि जागा देण्यासाठी अनुमती दिली आहे. आम्ही समर्थन दिलेलं आहे.

**आसिफ शेख :-**

महापौर साहेब, सुचनेचा प्रश्न येतोच कुठे? हा ठराव झालेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठराव कुठे पास झाला?

**(सभागृहात गोंधळ)**

**नरेंद्र मेहता :-**

.......... दोन्ही समाजांना आपण ठरावात समाविष्ठ करावे तसेच महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आरक्षण दोन्ही समाजांना द्यावे अशी मी सुचना मांडत आहे.

**भगवती शर्मा :-**

आमच्या ठरावात सुचना घेणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

हा ठराव होता की सुचना होती.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही ठराव करा आम्ही सुचना घेणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुमच्या विरोधाचा ठराव द्या.

**एस.ए. खान :-**

शशिकांत भोईरच्या सुचनेचा समावेश करण्यात यावा, बाकी कोणाचीही सुचनेचा समावेश करु नये.

**मा. महापौर :-**

सुचनेसह ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**अनिल सावंत :-**

ठराव झालेला आहे. विरोधी पक्षाची सुचना होऊ शकत नाही.

**अनंत पाटील :-**

महापौर साहेब, आपण हा आगरी समाज संदर्भामध्ये जो प्रस्ताव आणलेला आहे. आणि आगरी समाजाने आपल्याकडे जे शिफारस पत्र दिलेलं आहे या संदर्भात मा. महापौर, उपमहापौर आणि विरोधीपक्ष, सभागृह नेता ह्या सर्वांनी आपल्याला संमती दिलेली आहे ह्या आगरी समाजाची हे भवन किंवा ही जागा मिळो आणि या संदर्भात आपण सर्व सहमत आहात त्याबद्दल मी तुम्हा सर्वांच आणि प्रशासनाचं अभिनंदन करतो.

**मा. महापौर :-**

माजी महापौरांची सुचना फेटाळण्यात आलेली आहे आणि शशिकांत भोईर ह्यांच्या सुचनेसह ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**मिलन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, विनंती आहे की, महापौर साहेब त्यांना हे सुद्धा कळू दे की, जेव्हा पाणी आंदोलन झाले तेव्हा आम्ही मार खाल्लेला आहे आणि आम्हाला एक दिवसाची सजा सुद्धा झालेली आहे. आयुक्त साहेब, आमची तुम्हाला विनंती आहे की, नगरसेवकासाठी तुम्ही जे १०.३० ते १२.०० पर्यंत टाईम दिलेले आहे. आणि दोन दिवस ठेवले आहेत. आम्हाला सकाळी वॉर्डाचे काम असते. सकाळी इतरत्र कामाला जात असतात. तर आम्हाला ह्या टाईमामध्ये भेटण्याची शक्यता कमी असते. म्हणून आम्हाला १२ ते ३ चे टाईम दिले आणि आठवड्यातून तीन दिवस दिले तर बरे होईल. तर आम्ही तुमचे आभारी आहोत.

**शशिकांत भोईर :-**

ठरावाच वाचन करून ठराव कायम करण्यात यावा अशी आम्ही मागणी करतो.

**आसिफ शेख :-**

ठराव वाचून कायम झालेला आहे.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आगरी समाज उन्नती संस्था, यांनी विकास आराखड्यातील आ.क्र.१२२ ही जागा संस्थेसाठी मागणी केलेली आहे.

मागणी केलेली जागा सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा व शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक असल्याचे संस्थेने अर्जात नमूद केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. १२२ हे आरक्षण “Play Ground & Social Forestry” (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या नावाने प्रस्ताविक असून आरक्षणाखालील क्षेत्र ४६७००.०० चौ.मी. आहे. यापैकी ३०५३३.६० चौ.मी. महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

आगरी समाज उन्नती समाज संस्थेस जागा देण्याबाबत (१) मा. श्री. तुळशीदास म्हात्रे, महापौर, (२) मा. आ. श्री. गिल्बर्ट मेन्डोन्सा, (३) मा. खा.डॉ. संजीव नाईक, (४) मा. श्री. मुझफ्फर हुसैन, माजी आमदार,

(५) मा. श्री. जगन्नाथ पाटील, माजी खासदार, (६) मा. आ. श्री. रामनाथ मोते या लोकप्रतिनिधींनी शिफारस केलेली आहे.

मागणी केलेली जागा ही खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या वापरासाठी असल्यामुळे खेळाचे मैदान हे सार्वजनिक वापरासाठी सर्वांसाठी खुले ठेवण्यात यावे व अनुज्ञेय होणारे बांधकाम क्षेत्राचा वापर संस्थेने करावा. तसेच खेळाचे उपक्रमासाठी आवश्यकतेप्रमाणे नियमानुसार पूर्वमंजूरी घेवून बांधकाम करणे आवश्यक राहील.

संस्था वापर करण्या-या बांधकाम क्षेत्रासाठी आवश्यक असणा-या भूखंड क्षेत्राचे भाडे संस्थेकडून प्रचलित नियमावलीनुसार वसूल करावे लागेल. तसेच खेळाचे मैदानाची देखभाल व दुरुस्ती संस्थेने विनाअट करणे बंधनकारक राहील.

आरक्षणाखालील जागेत नियमानुसार अनुज्ञेय होणारे बांधकाम करण्यासाठी होणारा खर्च संस्थेस करावा लागेल.

आगरी समाज उन्नती संस्था यांना आ.क्र.१२२ मधील महानगरपालिकेच्या ताब्यातील जागेपैकी दोन एकर जागा (मैदान व सामाजिक वनीकरणाची जागेमधून क्षेत्र निश्चित करुन) ३० वर्षांसाठी भाड्याने देण्यास ही सभा मान्यता देत आहे. महानगरपालिकेने ह्या समाजास दिलेली जागा रिमार्केशन करुन द्यावी.

सदर जागेचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) नुसार भाडे प्रशासनाने ठरवून त्यात प्रत्येक ५ वर्षांत १०% वाढ करण्यात यावी. हा प्रस्ताव शासनाकडे पाठवून प्रस्ताव मान्य झाल्यावर भूखंडाचा ताबा दिल्यापासून भाडे आकारण्यात यावे. सदर भूखंडावर नियमानुसार अनुज्ञेय बांधकाम करण्याची परवानगी देण्यात यावी. सदर भूखंडाबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार ही सभा मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. एस.ए.खान** **अनुमोदक :- आसिफ शेख**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर व अनुमोदक श्री. प्रेमनाथ पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आगरी समाज उन्नती संस्था, यांनी विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १२२ ही जागा संस्थेसाठी केलेली आहे. सदर आरक्षण क्र. १२२ हे आरक्षण खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या नावाने प्रस्तावित असल्यामुळे महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६५ च्या कलम ३७/१ आरक्षणात फेरबदल करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**मा. महापौर :-**

सदरच सर्व अधिकारी पत्रकार बांधू, प्रेक्षक ह्या ठिकाणी जो आगरी समाजाचा ठराव झालेला आहे. हा ठराव सर्वांनुमते पास झाल्यामुळे ह्या सभागृहातील सर्वांना धन्यवाद देतो. अशाच प्रकारच सभागृहात खेळीमेळीचे वातावरण चालले तर ह्या शहराचा विकास होईल. हा जो हॉल बांधणार आहेत तो सर्व समाजासाठी बांधणार आहोत. तो फक्त आगरी समाजासाठी नाही.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, इकडे बरेचसे सदस्य आगरी आहेत. तुम्ही आम्ही आगरी आहोत. तुम्ही आम्ही आगरी आहेत म्हणण्यापेक्षा हे गाव आग-यांचं आहे, हे स्थळ आग-याचा आहे. इकडचा पहिला निवासी आगरी आहे. इतर शहरातील लोंढ्याना परप्रांतिय लोकांना इथे सामावून घेण्यामध्ये देखील आग-याची फार मोलाची भूमिका आहे. त्यांच्या जमिनी ज्याच्यावर त्याचा उदरनिर्वाह होतो. पोटाचा आधार देऊन मोठमोठ्या लोकांना दिले. त्याच्यावर इमले उभे राहीले. परप्रातियांना राहण्यासाठी घर उपलब्ध झाली अशा लोकांसाठी आगरी लोकांनी जो त्याग केला तो मला अस वाटते की सर्व सभागृहाने ध्यानात घेतला. आणि आजचा हा ठराव एकमताने सगळ्यांनी संमत केला आहे. त्यासाठी मी महापौर, उपमहापौर आणि संपूर्ण सभागृहाचे आगरी समाजाच्या वतीने मी इथे आभार मानून त्यांना धऩ्यवाद देते.

**प्रकरण क्र. ४० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आगरी समाज उन्नती संस्था - आ.क्र. १२२ ही जागा संस्थेस मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आगरी समाज उन्नती संस्था, यांनी विकास आराखड्यातील आ.क्र.१२२ ही जागा संस्थेसाठी मागणी केलेली आहे.

मागणी केलेली जागा सामाजिक, सांस्कृतिक, क्रिडा व शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक असल्याचे संस्थेने अर्जात नमूद केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. १२२ हे आरक्षण "Play Ground & Social Forestry" (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या नावाने प्रस्ताविक असून आरक्षणाखालील क्षेत्र ४६७००.०० चौ.मी. आहे. यापैकी ३०५३३.६० चौ.मी. महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

आगरी समाज उन्नती समाज संस्थेस जागा देण्याबाबत (१) मा. श्री. तुळशीदास म्हात्रे, महापौर, (२) मा. आ. श्री. गिल्बर्ट मेन्डोन्सा, (३) मा. खा.डॉ. संजीव नाईक, (४) मा. श्री. मुझफ्फर हुसैन, माजी आमदार,

(५) मा. श्री. जगन्नाथ पाटील, माजी खासदार, (६) मा. आ. श्री. रामनाथ मोते या लोकप्रतिनिधींनी शिफारस केलेली आहे.

मागणी केलेली जागा ही खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या वापरासाठी असल्यामुळे खेळाचे मैदान हे सार्वजनिक वापरासाठी सर्वांसाठी खुले ठेवण्यात यावे व अनुज्ञेय होणारे बांधकाम क्षेत्राचा वापर संस्थेने करावा. तसेच खेळाचे उपक्रमासाठी आवश्यकतेप्रमाणे नियमानुसार पूर्वमंजूरी घेवून बांधकाम करणे आवश्यक राहील.

संस्था वापर करण्या-या बांधकाम क्षेत्रासाठी आवश्यक असणा-या भूखंड क्षेत्राचे भाडे संस्थेकडून प्रचलित नियमावलीनुसार वसूल करावे लागेल. तसेच खेळाचे मैदानाची देखभाल व दुरुस्ती संस्थेने विनाअट करणे बंधनकारक राहील.

आरक्षणाखालील जागेत नियमानुसार अनुज्ञेय होणारे बांधकाम करण्यासाठी होणारा खर्च संस्थेस करावा लागेल.

आगरी समाज उन्नती संस्था यांना आ.क्र.१२२ मधील महानगरपालिकेच्या ताब्यातील जागेपैकी दोन एकर जागा (मैदान व सामाजिक वनीकरणाची जागेमधून क्षेत्र निश्चित करुन) ३० वर्षांसाठी भाड्याने देण्यास ही सभा मान्यता देत आहे. महानगरपालिकेने ह्या समाजास दिलेली जागा रिमार्केशन करुन द्यावी.

सदर जागेचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) नुसार भाडे प्रशासनाने ठरवून त्यात प्रत्येक ५ वर्षांत १०% वाढ करण्यात यावी. हा प्रस्ताव शासनाकडे पाठवून प्रस्ताव मान्य झाल्यावर भूखंडाचा ताबा दिल्यापासून भाडे आकारण्यात यावे. सदर भूखंडावर नियमानुसार अनुज्ञेय बांधकाम करण्याची परवानगी देण्यात यावी. सदर भूखंडाबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार ही सभा मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. एस.ए.खान** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर व अनुमोदक श्री. प्रेमनाथ पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आगरी समाज उन्नती संस्था, यांनी विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १२२ ही जागा संस्थेसाठी केलेली आहे. सदर आरक्षण क्र. १२२ हे आरक्षण खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या नावाने प्रस्तावित असल्यामुळे महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६५ च्या कलम ३७/१ आरक्षणात फेरबदल करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४१, सन्मा. सदस्य श्री. अनिल दिवाकर सावंत यांचे दिनांक १२/०७/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर शहरात गर्भलिंग चिकित्सा रोखून मुलींच्या मारेक-यांवर कडक कायदेशीर कारवाई करणेबाबत.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब प्रकरण ४१ अन्वये हा जो 'ज' चा प्रस्ताव आणलेला आहे. सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे महाराष्ट्रात मुलांच्या संख्येमागे मुलीच्या संख्येत लक्षणीय घट झालेली आहे. या समाजातील बरेचसे घटक ह्याला जबाबदार आहेत. उमलू पाहणा-या कळ्याना गर्भातच खुडून टाकण्याच्या घ्रुणास्पद प्रकारने महाराष्ट्रात थैमान घातले आहे. या विकृतीवर आपल्या शहरात कडक उपाययोजना करणे गरजेचे आहे. स्त्री भ्रुण हत्या व त्या मागची बुरसटलेली मानसिकता हा समाजाला लागलेला रोग आहे. लिंगनिदान प्रतिबंधक कायद्यात करावयाच्या स्पष्ट तरतुदीवर परंतु त्याची निट अंमलबजावणी होत नाही. ह्या रोगावर कायद्याबरोबरच इतर उपाययोजना करणे गरजेचे आहे. आपल्या शहरातील चार सोनोग्राफी केंद्राना महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने सिल केलेल आहे. अजूनही बरीचशी सोनोग्राफी केंद्रे ह्यांच्यात गुंतली असल्याची शक्यता आहे. त्याच्यावरही कडक कारवाई करण्यात यावी. तसेच शहरातील महिलांना गर्भधारणा झाल्यानंतर महानगरपालिकेत त्याची नोंद करणे. बंधनकारक करावे. तरच त्यांना जन्म नोंदणीचा दाखला देण्यात यावा. अशा प्रकारचा हा 'ज' चा प्रस्ताव आहे. हा 'ज' चा प्रस्ताव आणण्यामागे एकच मुख्य कारण होत की, २०११ ची जी महाराष्ट्रातील जनगणना झाली. त्याच्यात मुलीच्या संख्येत लक्षणीय घट झाली. ८१६ मुली १००० मुलांच्या संपूर्ण राज्यमध्ये महाराष्ट्र शासन इतर महानगरपालिका या बाबतीच कायद्याची कठोर अंमलबजावणी करते. आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये चार सोनोग्राफी सेंटर सिल करण्यात आले. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अजूनही बरेचसे सोनोग्राफी सेंटरची नोंदणी झाली नाही. महानगरपालिकेच्या

परवाना विभागामध्ये जी नोदणी व्हायला पाहीजे ती झाली नाही. अशा प्रकारच्या गुन्ह्यामध्ये आरोपीना पकडणे फार कठीण असते. ह्याचा बऱ्याच ठिकाणी प्रत्यय आलेला आहे. महापालिका आणि राज्यशासनाने स्टिंग ऑपरेशन करून अशा प्रकारच्या गोष्टीना पायबंद घातलेला आहे. ती कडक उपाययोजना या शहरामध्ये आरोग्य विभागाच्या मार्फत योजली. नाहीतर मिरा भाईंदर शहरातील समाज जीवनाला धोका निर्माण होऊ शकतो असा हा प्रकार आहे. राज्यशासनावे याबाबतीत कडक निर्बंध टाकलेले आहेत. हा 'ज' च्या प्रस्तावावर मी ठराव मांडतो. प्रकरण ४१ च्या ठरावाचे वाचन करतो. लिंग निदान प्रतिबंधक कायद्यात कारवाईच्या स्पष्ट तरतुदी आहेत. परंतु त्याची नीट अंमलबजावणी होत नाही. या रोगावर कायद्याबरोबरच इतर उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या शहरामधील चार सोनोग्राफी केद्रांना महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने सील केलेले आहे. अजुनही बरीचशी सोनोग्राफी केंद्रे याप्रकारामध्ये गुंतली असल्याची शक्यता आहे. त्यांच्यावरही कडक कारवाई करणेत यावी. तसेच शहरातील महिलांना गर्भधारणा झाल्यानंतर ६० दिवसांच्या आंत महानगरपालिकेमध्ये त्याची नोंदणी करणेस बंधनकारक करावे. व तरच त्यांना जन्म नोंदणीचा दाखला देण्यात यावा. यासारख्या उपाययोजनांचा कायद्याच्या दृष्टीने सखोल अभ्यास करुन त्या दृष्टीने उपाययोजना करावी. पहिले अपत्य मुलगी असल्यास व दुसरे अपत्य मुलगी झाल्यास त्या मुलीच्या नावे महापालिकेने १८ वर्षासाठी रोख रक्कम २० हजार फिक्स डिपॉझीट स्वरुपात ठेवावे. प्रसुती पुर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायद्याच्या अंमलबजावणीसाठी बेकायदा कृत्य करणाऱ्या सोनोग्राफी सेंटरवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. असा मी ठराव मांडीत आहे.

**एस. ए.खान :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आयुक्त साहेब, सर्वप्रथम मी सन्मा. अनिल सावंतचे अभिनंदन करतो. अतिशय चांगला विषय त्यांनी सभागृहात आणलेला आहे. मला वैद्यकिय आरोग्य विभागाला विचारायच आहे की गेला महिनाभर गर्भलिंग चिकित्सा प्रकरण पेपरमध्ये गाजते. आपल्या आरोग्य विभागाकडून हा ठराव येण्यापूर्वी काय कारवाई करण्यात आली ह्याची माहीती सभागृहाला द्यावी.

**डॉ. पडवळ :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, इ.सी.पी.एन.डी.टी कायद्या अंतर्गत कारवाई करण्याचे अधिकार संबंधित महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य अधिकारी ह्यांना देण्यात आलेले आहेत. आणि वैद्यकिय अधिकारी ह्यांना त्यांचे अधिकार हे खालील वैद्यकिय अधिकाऱ्यांना देण्याचे अधिकार आहेत. आरोग्य केंद्राच्या हद्दीत असलेले सर्व आरोग्य सेंटर दर तीन महिन्यातून एकदा तपासायचे आहे. त्याचा अहवाल आपण शासनाला पाठवतो. त्याच्यानंतर शासनाने १५ दिवसाला किती सेंटर तपासले, त्या सेंटरमध्ये गेल्यानंतर 'एफ' फॉर्म म्हणून एक फॉर्म असतो. त्या फॉर्मध्ये एक मुलगी किंवा दोन मुली अशा असलेल्या किती लेडीज आल्या होत्या आणि त्या लेडीजने सोनोग्राफी केल्यानंतर त्या फर्दरच्या प्रेग्नेसीच काय झाल हे आमच्या स्टाफ तर्फे घरी जाऊन तपासणी केली जाते. आणि त्याचा अहवाल दिला जातो. ह्यानंतर एक किंवा दोन मुली नंतर जर गर्भपात होत असतील आणि तो सेकंड ड्रायमन्स्टर हॉस्पीटलमध्ये होत असेल तर तिथे शंकेला जागा असते. कारण सेकंड ड्रायमन्स्टरमध्ये मोस्टली किडसचा सेक्स कळतो. आणि १४ आठवड्यामध्ये आणि सेकंड आठवड्यामध्ये फिमेलचे गर्भपात होतात. ते चेक करण्याच्या दृष्टीने शासनाने कारवाई करण्याचे सुचना दिलेल्या आहेत. आणि त्याप्रमाणे आपली कारवाई चालू आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मिरा भाईंदरमध्ये संशयास्पद सेंटर आढळले आहे का?

**डॉ. पडवळ :-**

मागच्या वेळेस शासनाच्या ह्याच्यानुसार १३ जून ते ३० जूनमध्ये जो ड्राईव्ह घेतला होता. त्यामध्ये ४८ सेंटरपैकी ४ सेंटर ही रेकॉर्ड ठेवण्यामध्ये उणिवा आढळल्यामुळे सिल केलेले आहेत. त्याच्यावरती २५ तारखेला कोर्टामध्ये केस दाखल केली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आतापर्यंत एकदाच केलेल की ह्यापूर्वी सुध्दा केलेल होत.

**डॉ. पडवळ :-**

ह्याच्यापूर्वी कधी सिल केल नव्हत. ही फर्स्ट टाईम कारवाई आपण केली.

**एस.ए.खान :-**

अशा किती केसेस झाल्या आहेत.

**डॉ. पडवळ :-**

चार सेंटर सिल केलेल होते.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

महापौरके परमिशनसे बोलना चाहूँगा की जो चार सेंटर सिल किये है। वह संशसास्पद है क्या? यह जो क्लिनिक ॲक्ट है। उसमे १८ रूल्स बनाये है। उसमें कई रूल्स ऐसे है जीस रूल के आधारपर डॉक्टरको काफी हैरानी परेशानी होती है। अननेसेसरी उसका युज हो भी सकता है। चार सेंटर जो सिल किया है। उसमे कैसा था की सब रूल्स का पालन किया जाए। एक जो लॉ की बुक रिसेप्शन के उधर होनी चाहिए वो नही थी उसके लिए उसको सिल किया छोटी रूल है। वह रूल सही भी है। लेकीन वो डॉ. कितने हरेसमेन्ट है। वह खुद समझ सकते है। दुसरा जो सेंटर सिल किया उसमे सभी पेपर बराबर पर जो पेपर डॉक्टर के पास रखते है। उसपे वो डॉ. साईन करना भूल गई थी। टॅली करने के बाद सब मिलता है। इसका मतलब कुछ गडबड नही फिर भी वह सिल हुआ है। उनका कामधंदा बंद है। कोर्ट मॅटर जायेगा मशिनरी नही होगी सेंटर के उपर डॉ. नाम नही था। रूल है की डिसप्ले होना चाहिए। डॉक्टर नेम वॉज डिसप्ले इन द टाईम मस्ट डिसप्ले वो थोडासा चेंज हुआ क्योंकी डॉ. चेंज हुआ था। उसके लिए वो भी सिल हुआ है। क्लीटीसाईजका एक्झाम्पल नही है। चार और केसको नोटीस दिया गया था। उसमे रेन्युअल रजिस्ट्रेशन नही था। सिर्फ गॅप था। उसमें भी जो मेडिकल पावर मे नॉट पावर कैसे युज किया जाए उनके उपर है। उनको नोटीस दे के अच्छा किया है।उसको सिल नही किया है। और एक सेंटर ऐसा जिसमे रेग्युलर मन्थली डेटा आना चाहिए। वह छह-सात महिनेसे नही आ रहा था। उसको सिल करना चाहिए। मेरा महासभासे अनुरोध है। टेक्नीकल पॉईंट है। लेकिन यह पी.एन.डी.टी. ॲक्ट जो है। उसमे इटसेल्फ कही सारी कमीया है। और मेरी जानकारी में. बी.एम.सी के अंदर यह डिसीजन दिया गया है। जो मायनर अफोयन्सेस थे वो सिल खुद बी.एम.सी. खोल रहे है। मैने साहब को रिक्वेस्ट किया है की स्टडी करे क्योकी कोर्ट में जाना कन्सलटन्सी को वो बडा अपराध नैतिक रूपसे होगा। तो आयुक्त साहबसे रिक्वेस्ट है की, बी.एम.सी. की ऑर्डर को देखे और हो सकता है तो मायनर अफोयन्सेस की रिलीज किया जाये।

**प्रशांत पालांडे :-**

डॉ. साहेब, त्या १७ पॉईंटमध्ये १८ वा पॉईन्ट ॲड करायचा आहे. टेक्नीकल कारणामुळे चे चार सिल केले तिकडे तुम्हाला काय संशयास्पद आढळले. तर त्यांची नावे सभागृहाला कळू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

जे १८ पॉईन्ट आहेत. त्याच्यात डी.एन.ए. टाका डी.एन.ए. टेस्ट करायला सुरूवात झाली की आपोआप गि-हाईक कमी जाईल. म्हणजे लफडे राहणार नाही.

**प्रभात पाटील :-**

संबंधीत केंद्राना सिल करताना किंवा कारवाई करताना तिथे येणार जे दांम्पत्य आहे. लिंग चिकित्सेसाठी येतात त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल करावा. ही सुचना नमूद करा.

**मिलन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, सावंत साहेबांनी जो ठराव मांडला त्याच्यात त्यानी १५ दिवसाचा उल्लेख केला आहे.

**अनिल सावंत :-**

१५ दिवसाचा नाही. दोन महिन्याचा उल्लेख केला. डॉक्टराशी बोलल्यानंतर बदल केला.

**मिलन पाटील :-**

कमीत कमी तीन महिने पाहीजे.

**मिलन म्हात्रे :-**

आमची डी.एन.ए.टेस्टची सुचना घेतली की नाही.

**मिलन पाटील :-**

आज छोटे मोठे डॉक्टर जे हॉस्पीटल चालवतात. त्यांना काय तकलीफ होतात. त्याच्या मशिनरी किती महाग असतात. त्याचा बोध घेऊन त्याचा विचार करून त्या जर छोट्या-मोठ्या गोष्टी असल्या तर त्याला समज द्यावी. त्याला लेखी समज द्यावी. छोट्या मोठ्या कारणासाठी सिल करणे अयोग्य दिसते. त्याच्यामागे तुमच काय इन्टेन्शन आहे ते सभागृहाला निट समजत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

तुम्ही त्याची बाजू घेता.

**मिलन पाटील :-**

त्यांना बॅकच त्यांना हे भरायच असते तर त्यांना लेखी दिल. एक दोन वेळा कारवाई केली तर ते मला योग्य अस वाटेल.

**प्रशांत पालांडे :-**

महापौर साहेब, बाजू घेतात की विरोध करतात तेच काही कळत नाही.

**राजेंद्र जैन :-**

एक आदमी को उधर काम करने दो वो काम कर पाएगा आप पिछला आरोप लगा रहे है। इन अधिकारी को आके दो महिने भी नही हूए लेट इन वर्क कन्सीटेन्टल कम्प्युटेन्टली तभी वो काम कर पाएगे आरोप लगाने से कुछ होने वाला नही।

**जूबेर इनामदार :-**

डॉ. साहेब, शहरामध्ये किती केंद्र आहेत.

**डॉ. पडवळ :-**

मिरा भाईंदर महापालिकेत सोनोग्राफिचे ४८ सेंटर आहेत आणि आपल्या हद्दीत एकही अनरजिस्टर सेंटर नाही सर्व सेंटर रजिस्टर आहेत.

**जूबेर इनामदार :-**

हॉस्पीटलमध्ये जी सोनोग्राफी करतात त्याची नोंद आहे का?

**डॉ. पडवळ :-**

त्या सर्वांची नोंद आहे.

**शशिकांत भोईर :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, डॉ साहेब आपण बोलतो की मिरा भाईदर मध्ये ४८ सोनोग्राफीचे सेंटर आहेत त्याच्यातील चारवर कारवाई केली तर उरलेल्या ४४ वर काय कारवाई केली त्याचा खुलासा करावा.

**डॉ. पडवळ :-**

४८ पैकी चार केंद्र सिल केली आणि चार केंद्रांना नोटीस दिली आहे कारण त्यांनी विहित मुदतीत रजिस्ट्रेशन न केल्यामुळे त्याचा रिप्लाय आपल्याकडे आलेला आहे. ॲडव्हाईजर कमिटीच्या मिटींगपुढे त्यांचे रिप्लाय ठेऊन आणि ॲडव्हाईजर समितीच्या सल्ल्याने त्याच्यावर ॲक्शन घेण्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

४४ दवाखान्याचे कागदपत्र व्यवस्थित होते का?

**डॉ. पडवळ :-**

व्यवस्थित आहे.

**शशिकांत भोईर :-**

कुठे चुकी आढळली नाही.

**नयना म्हात्रे :-**

महापौराच्या परवानगीने बोलते आज शाळा चालू होऊन दोन महिने झाले. मुलांना अद्याप गणवेश का दिले नाही.

**मा. महापौर :-**

माहिती घेऊन सांगतो.

**नयना म्हात्रे :-**

माहिती कधी पुढच्या महिन्यात घेणार शिक्षण अधिकारी बसले आहे. पावसाचे दिवस चालू आहेत मुलांना गणवेश द्यायला नको.

**मा. महापौर :-**

हा विषय नाही.

**नयना म्हात्रे :-**

मला माहित आहे विषय नाही परंतु गरीबांची लहान लहान मुलं शाळेत जातात.

**मा. महापौर :-**

अधिकाऱ्यांना बोलवतो.

**नयना म्हात्रे :-**

दिवाळीला देणार का?

**मा. महापौर :-**

आजच विचारतो.

**प्रकरण क्र. ४१ :-**

मिरा भाईंदर शहरात गर्भलिंग चिकित्सा रोखून मुलींच्या मारेकऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करणेबाबत.

**ठराव क्र. ४३ :-**

लिंग निदान प्रतिबंधक कायद्यात कारवाईच्या स्पष्ट तरतुदी आहेत. परंतु त्याची नीट अंमलबजावणी होत नाही. या रोगावर कायद्याबरोबरच इतर उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या शहरामधील चार सोनोग्राफी केंद्रांना महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने सील केलेले आहे. अजुनही बरीचशी सोनोग्राफी केंद्रे याप्रकारामध्ये गुंतली असल्याची शक्यता आहे. त्यांच्यावरही कडक कारवाई करणेत यावी. तसेच

शहरातील महिलांना गर्भधारणा झाल्यानंतर ६० दिवसांच्या आंत महानगरपालिकेमध्ये त्याची नोंदणी करणेस बंधनकारक करावे. व तरच त्यांना जन्म नोंदणीचा दाखला देण्यात यावा. यासारख्या उपाययोजनांचा कायद्याच्या दृष्टीने सखोल अभ्यास करुन त्या दृष्टीने उपाययोजना करावी. पहिले अपत्य मुलगी असल्यास व दुसरे अपत्य मुलगी झाल्यास त्या मुलीच्या नावे महापालिकेने १८ वर्षासाठी रोख रक्कम २० हजार फिक्स डिपॉझीट स्वरुपात ठेवावे. प्रसुती पुर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायद्याच्या अंमलबजावणीसाठी बेकायदा कृत्य करणाऱ्या सोनोग्राफी सेंटरवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.४२, सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०७/०७/२०११ (नगरसचिव कार्यालयास प्राप्त दि. १३/०७/२०११) रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नागरीकांना डोमिसाईल सर्टीफिकेट महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयातून उपलब्ध होणेकरीता महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव देणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका ठाणे जिल्ह्यातील सर्वांत जास्त झपाट्याने वाढते शहर आहे. सध्या या शहराची लोकसंख्या सुमारे १२ लाखापर्यंत झाली आहे. महानगरपालिका क्षेत्रात मुंबई शहरातून, उपनगरातून व उत्तर भारत, गुजरात, बंगाल, राजस्थान व देशातील अनेक शहरातून येणाऱ्या नागरिकांची संख्या सर्वांत जास्त आहे. महानगरपालिकेमध्ये जन्म मृत्यू दाखला, आस्थापना प्रमाणपत्र, सध्या विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र उपलब्ध होत आहे. त्यामुळे जनतेला सहजरित्या प्राप्त होत असल्याने, याच धर्तीवर 'डोमिसाईल सर्टीफिकेट' हे सध्या तहसिलदार कार्यालयातून देण्यात येते. परंतु भारतात सर्वाधिक लोकसंख्येच्या मानाने जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र पाहता हा सर्वांत मोठा जिल्हा आहे. या जिल्ह्यात एकच तहसिलदार कार्यालय असल्याने गरजूना ते मिळण्यास फार वेळ लागतो. जिल्ह्याच्या तहसिलदार कार्यालयात जाण्या-येण्याकरीता आर्थिक बाब जास्त खर्च होते. हेच डोमिसाईल सर्टिफिकेट जर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयामध्ये उपलब्ध होऊ शकले तर, त्याचा लाभ सर्व मिरा भाईंदर वासियांना मिळू शकेल व त्याचा चांगला प्रतिसाद जनतेकडून मिळू शकेल. मुंबई महानगरपालिकेतर्फे डोमिसाईल सर्टिफिकेट महानगरपालिकतर्फे देणे बाबतचा प्रस्ताव पारित करून शासनाकडे पाठवला आहे.

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने देखील डोमिसाईल सर्टीफिकेट प्रभाग कार्यालयातून देणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा असा मी ठराव मांडत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नागरीकांना डोमिसाईल सर्टीफिकेट महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयातून उपलब्ध होणेकरीता महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव देणेबाबत.

**ठराव क्र. ४४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका ठाणे जिल्ह्यातील सर्वांत जास्त झपाट्याने वाढते शहर आहे. सध्या या शहराची लोकसंख्या सुमारे १२ लाखापर्यंत झाली आहे. महानगरपालिका क्षेत्रात मुंबई शहरातून, उपनगरातून व उत्तर भारत, गुजरात, बंगाल, राजस्थान व देशातील अनेक शहरातून येणाऱ्या नागरिकांची संख्या सर्वांत जास्त आहे. महानगरपालिकेमध्ये जन्म मृत्यू दाखला, आस्थापना प्रमाणपत्र, सध्या विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र उपलब्ध होत आहे. त्यामुळे जनतेला सहजरित्या प्राप्त होत असल्याने, याच धर्तीवर 'डोमिसाईल सर्टीफिकेट' हे सध्या तहसिलदार कार्यालयातून देण्यात येते. परंतु भारतात सर्वाधिक लोकसंख्येच्या मानाने जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र पाहता हा सर्वांत मोठा जिल्हा आहे. या जिल्ह्यात एकच तहसिलदार कार्यालय असल्याने गरजूना ते मिळण्यास फार वेळ लागतो. जिल्ह्याच्या तहसिलदार कार्यालयात जाण्या-येण्याकरीता आर्थिक बाब जास्त खर्च होते. हेच डोमिसाईल सर्टिफिकेट जर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयामध्ये उपलब्ध होऊ शकले तर, त्याचा लाभ सर्व मिरा भाईंदर वासियांना मिळू शकेल व त्याचा चांगला प्रतिसाद जनतेकडून मिळू शकेल. मुंबई महानगरपालिकेतर्फे डोमिसाईल सर्टिफिकेट महानगरपालिकतर्फे देणे बाबतचा प्रस्ताव पारित करून शासनाकडे पाठवला आहे.

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने देखील डोमिसाईल सर्टीफिकेट प्रभाग कार्यालयातून देणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३, सन्मा. सदस्य श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे यांचे दिनांक १३/०७/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- अग्निशमन दलात अधिकारी व कर्मचारी यांची नव्याने केलेली भरती प्रक्रिया रद्द करुन रितसर चौकशी करणेबाबत.

**प्रशांत पालांडे :-**

आयुक्त साहेब, ह्या विषयावर आतापर्यंत अनेक भरती प्रक्रिया झाल्या आहेत. ब-याचशा विवादास्पद असतील परंतु, फायर ब्रिगेडची जी भरती आहे. ह्या भरती प्रक्रीयेमध्ये एवढी नाचक्की झाली ना एवढी कुठल्या भरतीमध्ये झाली नाही. म्हणजे ज्या व्यक्तीला गाडी चालवता येत नाही अशा व्यक्तींना ड्रायव्हर म्हणून भरती केलं आहे. त्यांना गाडीच इग्नेशियन कुठे आहे ते माहित नाही. परवा अशी घटना घडली की इंजिन ऑईलच्या जागी त्या ड्रायव्हरने गाडीमध्ये दोन बादल्या पाणी टाकलं अशा प्रकारची भरती आपण ह्या ठिकाणी केलेली आहे. माझी अशी विनंती आहे की, या संपुर्ण भरतीची चौकशी करावी दोषी व्यक्तींना ताबडतोब काढुन टाकावं आणि ह्या भरती प्रक्रीयेत जे अधिकारी दोषी आहेत त्यांना निलंबीत करावं अशा प्रकारचा हा ठराव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझी सुचना आहे, संपूर्ण भरती प्रक्रियेचं ही मी केलेल्या जनहीत याचिकेवरती ९२ पदे भरायची होती सदर निकाल २००९ साली झाला त्यानंतर २०११ पर्यंत थोडी थोडी भरती चालू आहे. सहा वर्षापासून हा प्रस्ताव आपण स्टेट गव्हर्नमेंटकडे पाठवला आहे. गव्हर्नमेंट तुम्हाला प्राधान्य मिळत नव्हतं. मा. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायधिशांनी एक आठवड्याच्या आतमध्ये मुख्यमंत्री कार्यालयातून हा प्रस्ताव मंजूर करुन तो आमच्याकडे टेंडर करा असा आदेश झाला आणि त्या आदेशामध्ये जे पात्र अनुभवाने सक्षम जे अधिकारी आणि कर्मचारी आहेत ह्यांची भरती करा. असे असताना वाटेल तशी भरती चालली आहे. माझ्याकडे संपूर्ण फाईल आहे. त्याच्यात तत्कालीन आयुक्त शिवमुर्ती नाईक ह्याचे किती नातलग कामाला लागले. स्वतः आयुक्त असताना शिवमुर्ती नाईकांनी आपले दुरदुरचे नातेवाईक ह्या भरती प्रक्रियेत सामील करुन घेतले आहेत. पहिली तक्रार १६/०८/२०१० ची आहे. ह्याच्यावरती प्रशासनाकडुन अजून उत्तर आलेलं नाही. तुमचा महासभेत ठराव पास झालेला आहे. त्याच्यात जी आरक्षित पदे आहेत त्याच्या आरक्षणाच्या सक्षमतेचे सर्टीफिकेट आणल्या नंतर त्याला तुम्ही भरती करुन घ्यायचे आहे. तसे न करता भरती झालेली आहे. ठरावाच्या विरोधात काम झाले आहे. आयुक्त साहेब, महासभेचे ठराव काढून घ्या पूर्णपणे वाचून घ्या आणि त्या ठरावामध्ये काय काय म्हटले आहे ते बघा आणि त्याच्यानंतर तुम्ही निर्णय घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

आयुक्त साहेब, माझ्याकडे एक सर्टीफिकेट आहे ते तुम्ही बघा. प्रकरण क्र. ४३ च्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन दलात अधिकारी व कर्मचारी यांची भरती प्रक्रिया नुकतीच पूर्ण करण्यात आली. या भरती प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.या संदर्भात शासन निर्णय व मार्गदर्शक तत्वांची पायमल्ली करुन शासनाच्या आदेशाचा अवमान करण्याचे धारीष्ट्य प्रशासनाने दाखविले आहे.

अग्निशमन दलात नव्याने सबस्टेशन ऑफीसर, लिडींग फायरमन, यंत्रचालक व फायरमन या पदांवर नेमणुका करण्यात आल्या. शासन निर्णय (क्र.एफ.एफ.एस.१६२००३/७०७/प्र.क्र.७८/२००३/नवि-६, मंत्रालय-३२, दि. २४/०६/२००४), मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे पत्र (क्र.७७६/अस, दि.२९/१०/२००९), जाहिराती मधील अटीशर्ती व सेवा प्रवेश नियमानुसार या नेमणूका झाल्या नसल्याचे उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. दि. २०/०६/२०११ रोजी एकाच दिवशी यंत्रचालकाकडून झालेल्या दोन अपघातावरुन भरती प्रक्रियेतील निष्काळजीपणा व झालेला भ्रष्ट्राचार अधोरेखीत होतो. अग्निशमन वाहने चालविण्याचा अनुभव नसलेल्यांना यंत्रचालक पदी नेमून प्रशासनाने भ्रष्ट्राचाराचा कळस गाठलेला आहे.

अग्निशमन विभागासारख्या अति संवेदनाशिल व नागरीकांच्या जिवीत व मालमत्तेशी संबंधीत विभागात अपात्र व्यक्तींची नेमणूक दुर्भाग्यपूर्ण आहे. या सदोष नेमणूकांमुळे भविष्यातील कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास पालिकेचा अग्निशमन विभाग असमर्थ आहे अशी कबुली दि. ३०/०६/२०११ च्या पत्रानुसार प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिली आहे. या भरती प्रक्रियेमध्ये या अधिका-यास कोठेही सहभागी करण्यात आलेले नव्हते ही बाब अत्यंत गंभीर असुन अशाप्रकारचा आपल्या विभागातील भ्रष्ट भरती

प्रक्रिये बद्दल लिखित स्वरुपात विरोध करणाचा अधिका-याचा प्रयत्न हा पालिकेच्या इतिहासातील पहिलाच प्रसंग असावा.

ही बाब अत्यंत भयावह असून कोणताही लोकप्रतिनिधी अग्निशमन विभागाची ही अवस्था सहन करु शकत नाही. म्हणून शहरातील नागरीकांची सुरक्षितता लक्षात घेता अग्निशमन दलात नव्याने केलेली भरती प्रक्रियेची मा. आयुक्तांनी चौकशी करावी व या निवड प्रक्रियेमध्ये समाविष्ट असणा-या दोषी अधिका-यांवर कारवाइ्र करावी अशा प्रकारचा ठराव मी मांडत आहे.

**अनंत पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्यावर माझी सुचना घ्या. आपण ह्या प्रकरणावर महासभेत जे जे ठराव केलेले आहेत त्याच ह्याच्यात पालन करावं त्या ठरावानूसार पालन केलं जावं कारण आरक्षणास उमेदवार पात्र आहे की नाही, ते कागदपत्र त्यांचे योग्य आहेत किंवा नाहीत ह्या सगळ्याच्या हरकती आम्ही नोंदवल्या आहेत ही सुचना ह्या ठरावामध्ये समाविष्ठ करुन घ्यावी.

**भगवती शर्मा :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागात सहाय्यक अग्निशमन अधिकारी या पदावर श्री. क्लासो फर्नांडीस हे कार्यरत आहेत. महानगरपालिकेने अग्निशमन विभागाअंतर्गत मा.उच्च न्यायालयाचे निर्देशाचे अनुषंगाने मंजुर पदे महानगरपालिकेच्या सेवाशर्ती नियम -२००५ अंतर्गत नमुद तरतुदीप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाचे १९९६ च्या निकालाचे अनुषंगाने व्यापक प्रसिध्दी वृत्तपत्रात व सेवायोजन कार्यालये, महानगरपालिकेचे संकेतस्थळ इ. मध्ये पदे भरण्याची जाहिर प्रसिध्दी करून उमेदवाराचे अर्ज मागविण्यांत आले होते. मुदतीत महानगरपालिकेस प्राप्त अर्जदाराची स्पर्धात्मक परिक्षेद्वारा, लेखा परिक्षा घेवून लेखी परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची शारिरीक क्षमता चाचणी परिक्षा व तोंडी परिक्षा मिळून एकत्रीत गुणाची सरासरी पहाता गुणानुक्रमे उत्तीर्ण उमेदवाराची अंतिम निवड यादी महानगरपालिकेने जाहिर प्रसिध्द करून उमेदवारांना नेमणुक केली त्या नेमणुकीस मा. महासभेने मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. महासभेने याबाबत संबंधित उमेदवारांचे शैक्षणिक पात्रतेचा त्यांच्या संस्थेकडून मुळ प्रमाणपत्र वेरिफिकेशन करून आणण्यात यावी व त्यानंतर त्यांना त्या पदावर नेमणूक करावी. असेही स्पष्टपणे ठरावात नमूद केले होते. दाखले खोटे आढळल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेबाबत ठरावात नमूद केलेले आहे. अशाप्रकारे निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रा व्यतीरीक्त अन्य शासनमान्य संस्थातुन किमान सहा महिन्याचे अग्निशमन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांची प्रशिक्षण दरम्यान संस्थेची नोंदणी वैध व शिकविण्यांत येत असलेला पाठयक्रम राज्य/केंद्र शासनाचे प्रमाणित केल्याप्रमाणेच असल्याचे पडताळणीचे अटीवर तसेच सदर उमेदवारांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण संस्थेजवळ आवश्यकता असल्यास अग्निशमन पाठयक्रम प्रशिक्षणास पाठविण्याचे तसेच प्रशिक्षण यशस्वी पूर्ण करण्याच्या अटीवर मंजुरी दिलेली आहे. अशाप्रकारे महासभेने मंजुरी दिल्यानंतर कामावर हजर असलेल्या उमेदवारांना काही येत नसल्याबाबत जाहिर दुरचित्रवाणीसमोर वक्तव्ये करणे किंवा पदाधिकारी, नगरसेवक यांना लेखी पत्र देणे हि बाब गैरशिस्तीची असुन अधिका-याने विहीत मार्गाने मा. उपायुक्त, मा. आयुक्त, मा.प्रधान सचिव अशा क्रमवारीने त्यांचेवर अन्याय होत असेल तर दाद मागणेची पध्दत आहे. परंतु त्यांचेवर कोणताही अन्याय झालेला नसताना केवळ दृष्ट हेतुने महानगरपालिकेस बदनाम करण्याचा कट केला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त,अपील व वर्तणुक) नियम -१९७९ चे कलम -३ अन्वये अधिका-यांवर काही बंधने निश्चित केली आहेत. त्याचा भंग अधिका-यास करता येत नाही परंतु श्री. क्लासो फर्नांडीस, सहा. अग्निशमन अधिकारी यांनी शिस्त व वर्तणुक नियमाचा भंग केलेला असुन त्यांचे या वर्तनामुळे महानगरपालिकेची सर्वत्र बदनामी झालेली आहे. तरी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त, अपिल व वर्तणुक) नियमाचा भंग करणा-या अधिका-यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - १९४९ चे कलम - ५६ अन्वये चौकशीसाठी निलंबित करण्यांत यावा व ज्यांनी ज्यांनी प्रशासनाची व मनपाची खोटी बदनामी केली त्यांच्यावर प्रशासनाने कायदेशीर कारवाई करावी. व संपूर्ण कारवाई झाल्यानंतर अहवाल मा. महासभेपुढे ठेवावा असा ठराव मांडत आहे.

**एस. ए. खान :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर साहेब, ह्या प्रकरणात उच्च न्यायालयमध्ये ३८८८ ऑफ २०११ ही न्यायलयीन केस दाखल झाले ह्या ठरावावर माझी सभागृहाला नम्र विनंती आहे. मतदान घ्यावं आम्हाला ह्याच्यात विरोध करायचा आहे. ही न्यायलयीन बाब आहे. हायकोर्टात न्याय प्रविष्ठ आहे. हे पाश्चात बुध्दीने आहे. तुमचा ठराव रद्द केला गेला आहे. मतदानाला टाकावा म्हणजे व्हेरी क्लीअर कोण बाजूने आहे कोण नाही ह्या पापाला आम्ही भागी पडणार नाही. माझा व्यक्तीगत विरोध आहे. तुम्ही हा ठराव मतदानाला घ्या.

**अनिल सावंत :-**

दोन ठराव आले आहेत ते मतदानाला जातील.

**मिलन म्हात्रे :-**

सिंगल आलेला आहे. तो निराळा आहे. हा निराळा आहे. हा विषयपत्रिकेवर नाही. हा ठराव तुम्ही मतदानाला घ्या. हिंमत असेल तर मतदान घ्या.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब सन्मा. नगरसेवक प्रशांत पालांडे ह्यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याच्यात त्यांनी दोन वाक्ये टाकलेली आहेत ती दोन वाक्ये त्या ठरावातून काढणार असतील तर माझा आक्षेप नाही.

**प्रशांत पालांडे :-**

कोणती वाक्य?

**अनिल सावंत :-**

त्यांनी ह्या ठरावामध्ये म्हटलं आहे ह्या भरती प्रक्रीयेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचे दिसून आले आहे ह्या संदर्भात शासन निर्णय व मार्गदर्शक तत्वाची पायमल्ली करुन शासनाच्या आदेशाचं अवमान करण्याचे धारीष्ठ प्रशासनाने दाखवले आहे त्यांनी प्रशासन म्हटले आहे परंतु हा ठराव महासभेमध्ये झाला आहे. ह्या ठरावाला पूर्ण महासभा जबाबदार आहे ते जर ही दोन वाक्ये काढणार असतील तर कारण अनियमितता आणि भ्रष्टाचार हे ठरावामध्ये होऊ शकत नाही. तुम्ही कुठेही जा तुम्हाला नगरविकास आहे उच्च न्यायालय आहे तिथे जाऊन ते आरोप सिध्द करा.

**प्रशांत पालांडे :-**

प्रशासनावर आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

शासनाची पत्र आलेली आहेत. चौकशी सुरु झाली आहे.

**अनिल सावंत :-**

शासनाची पत्र आहेत परंतु जनरल बॉडीमध्ये तुम्ही ठराव मांडता त्यामधुन दोन वाक्ये कृपया काढुन टाका.

**मिलन म्हात्रे :-**

नाही कशाला काढायची शासनाची पत्र आहेत. काढायची नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब, सन्मा. प्रशांत पालांडे ह्यांनी जो ठराव मांडला आहे पूर्ण शहराची ह्याच्यात बदनामी होते. विषय असा आहे की, ज्यावेळेला भरती प्रक्रिया चालू झाली त्यावेळी कुठलेही शासनाचे जी.आर. किंवा जे काही आपण पेपर जाहिरात मागवून इंन्टरव्ह्यु कॉल केले त्याचही पालन केलं गेलं नाही उदा. पाच वर्षाचा फायर ब्रिगेडचा लिडींग फायरमन असू द्या, सब स्टेशन ऑफीसर असू द्या अनुभव असला पाहिजे तो कोणाकडेही नाही. तपासलं तर मुलगा १८ वर्षाचा आज होतो आणि ट्रेनिंग सर्टीफिकेट दोन दिवसा अगोदरच आहे. ॲल्कोन कंपनीमध्ये आग लागली होती तेच कर्मचारी आपल्या फॅक्टरीमध्ये काम करत होते. चार दिवसा अगोदर आपल्याकडे आले आणि तिकडे आग लागली त्यांनी कोर्स कधी केला. शासनाच्या जी.आर. प्रमाणे एस.एफ.टी.सी कोर्स केलेलं हे पर्टीक्युलर नॉर्म्सच्या खाली अपॉईंट करता येतील मा. आयुक्तांनी ह्याबद्दल हीअरींग झाली मा. सचिवाकडे तो विषय प्रलंबित आहे. बरेचसे अधिकारी त्या वेळेला होते आयुक्त साहेब होते त्यांनी सांगितलं सुप्रिम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे राज्य शासनाचा कुठलाही मान्यता दिल्याचा कोर्स केला आम्ही स्विकारलं आहे. पेपर जाहीरात करताना आपण सांगितलं की, एस.एफ.टी.सी. चा कोर्स केलेलाच पाहिजे आणि भरती करताना आपण कुठलही घेतला. पाच वर्षाचा जो एक्सपिरीयन्स पाहिजे तो आपण कुठेही घेतला नाही. रोस्टर पाहिजे पदोन्नती किती द्यायची भरती किती करायची तर रोस्टर सगळ्यासाठी वेगळा वेगळा लावला. महासभेने अजून रोस्टर फायनल केलं नाही. किती परसेंट पदोन्नती द्यायची आणि किती परसेट सरळ सेवेने भरायची. मागचा सेवाशर्ती नियम घेतला तर ५०-५० टक्के तो गव्हर्नमेंटकडे अजून पेंडींग आहे. नविन जे केलं त्याच्यात महासभेची मान्यता बाकी आहे त्याच्यात १०० टक्के पदोन्नती आहे. म्हणजे हा जो रोस्टर लावला गेला तो ही चुकीचा लावला गेला. जी सॅलरी दिली गेली ती कुठल्या नियमात एकाला जास्त सॅलरी दिली गेली एकाला कमी सॅलरी दिली हे ही समजत नाही. ड्रायव्हर भरती केले आपण सांगितलं पाच वर्षाचा अनुभव पाहिजे तर ड्रायव्हींग लायन्सस दिड वर्षा अगोदरच आहे. फायर टेंडर चालवण्यासाठी अनूभवी व्यक्ती पाहिजे तर तुम्ही टेम्पो चालवणा-या व्यक्तीला तुम्ही अपॉईंट केलं आहे. फायर टेंडर ह्या हेवी गाड्या असतात. माझ्याकडे हेवी गाडी असेल आणि लायसन्स जरी असेल तरी मी चालवू शकत नाही. कारण त्याचा अनुभव पाहिजे. आपल्याकडे तीन ॲक्सीडंट झाली. फायर टेंडरच्या गाडीखाली मयत झाला असता तर काय झालं असत. एकदा गाडी ठोकली एकदा गाडी हातगाडीवर पडली अशा लोकांना आपण भरती केलं आहे. ज्यांना अनुभवच नाही त्यांनी फायरमध्ये कामचं केलं नाही. आपण जो विषय आणला आहे. समाज विकास अधिकारी इंटरव्ह्युला जे पेपर द्यायला पाहिजे ते डॉमिसियल सर्टीफिकेट दिलं नाही. रहिवासी दाखला, लिव्हींग सर्टीफिकेट त्यांनी दिलं नाही अनेक पेपर त्यांनी दिले नाही आणि आपण म्हणतो एखादं कागदपत्र कमी असेल तर फॉर्म स्विकारला जाणार नाही. आम्ही आपल्याकडुन माहिती काढली तर त्यांनी अजूनपर्यंत पेपर दिलेच नाहीत. पाच अधिका-याने मार्क द्यायला पाहिजे. खांबित साहेब, त्या

कमिटीमध्ये आहेत त्यांच मार्कच घेतल नाही. एका अधिका-याला २० पैकी १७ ते १८ मार्क द्यायचे होते त्यांनी २५ मार्क दिले हे तुमच्याकडे रेकॉर्डला आहे दुसरी एक केस घडली. सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटीलने दाखवलं हे पटनाचं कसं आहे. एप्रिल महिन्यात आपण युर्निव्हर्सिटीला लेटर पाठवतो. युर्निव्हर्सिटी आपल्याला मार्चमध्ये म्हणजे एक महिना अगोदर एप्रिल महिन्याचं आऊटवर्ड टाकून रिप्लाय पाठवते हे स्पष्ट दिसते ते लेटर बोगस आहे कारण हे एप्रिलचं लेटर त्याला कसं समजलं मार्चमध्ये. एप्रिलच्या लेटरला २०-३ चा रिप्लाय देतो आऊटवर्ड टाकून.

**मा. महापौर :-**

सभागृहात ह्याच्यावर बोलायची गरज नाही कारण हेच तुम्ही टी.व्ही. वर बोललेले आहे. इथे कोण ऐकणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

विषय आहे हा आम्ही बोलतच नाही. आम्ही कोर्टात जाणार. आमचं निवेदन आहे आम्हाला अर्धा तास वेळ द्या. आम्ही आमची भुमिका मांडु.

**मा. महापौर :-**

महासभेत तुम्हाला न्याय पाहिजे तर तिकडे बोलायची काय गरज होती का?

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला बाहेरही बोलायचा अधिकार आहे.

**अनिल सावंत :-**

मेहता साहेबांना बरीच माहिती आहे तशी माहिती त्यांनी टी.व्ही. समोर सांगितली की ह्या अग्निशमनच्या भरती प्रक्रियेमुळे पोलिस केस दाखल करण्याचे आदेश झाले आहेत. ही वस्तुस्थिती आहे का? टी.व्ही. वर बोलले.

**नरेंद्र मेहता :-**

माझ्याकडे ते कागद आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**प्रशांत पालांडे :-**

महापौर साहेब, ह्या विषयावर मला प्रशासनाकडून एक स्पष्टीकरण हवं होतं. आपण जरा प्रशासनाला सांगा. सचिव साहेब, दोन ठराव कसे होतील वेगळे विषय आहेत.

**भगवती शर्मा :-**

त्याच विषयावर आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तुमचा ठराव काय आहे तो वाचा.

**प्रशांत पालांडे :-**

मला प्रशासनाकडुन ह्या भरतीबद्दल थोडे स्पष्टीकरण द्या.

**जूबेर इनामदार :-**

ठराव मतदानाला घ्या मतदान झाल्यावर स्पष्टीकरण देतील.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला सभेच्या कामकाजातील हा जो म आहे ना तो नीट वाचा. त्याच्यामध्ये ह्या तहकुब सभेच्या कामकाजाव्यतिरीक्त आणि सुचनेच्या व्यतिरीक्त कोणतेही कामकाज घेता येणार नाही.

**भगवती शर्मा :-**

मैने जो ठराव किया है...........

**(सभागृहात गोंधळ)**

**मिलन म्हात्रे :-**

भरती प्रक्रियेमध्ये क्लासो फर्नांडीसची भरती झाली नाही.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रशांत पालांडे यांच्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन दलात अधिकारी व कर्मचारी यांची भरती प्रक्रिया नुकतीच पूर्ण करण्यात आली. या भरती प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.या संदर्भात शासन निर्णय व मार्गदर्शक तत्वांची पायमल्ली करुन शासनाच्या आदेशाचा अवमान करण्याचे धारीष्ट्य प्रशासनाने दाखविले आहे.

अग्निशमन दलात नव्याने सबस्टेशन ऑफीसर, लिडींग फायरमन, यंत्रचालक व फायरमन या पदांवर नेमणुका करण्यात आल्या. शासन निर्णय (क्र.एफ.एफ.एस.१६२००३/७०७/प्र.क्र.७८/२००३/नवि-६, मंत्रालय-३२, दि. २४/०६/२००४), मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे पत्र (क्र.७७६/अस, दि.२९/१०/२००९), जाहिराती मधील अटीशर्ती व सेवा प्रवेश नियमानुसार या नेमणूका झाल्या नसल्याचे उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. दि. २०/०६/२०११ रोजी एकाच दिवशी यंत्रचालकाकडून झालेल्या दोन

अपघातावरुन भरती प्रक्रियेतील निष्काळजीपणा व झालेला भ्रष्ट्राचार अधोरेखीत होतो. अग्निशमन वाहने चालविण्याचा अनुभव नसलेल्यांना यंत्रचालक पदी नेमून प्रशासनाने भ्रष्ट्राचाराचा कळस गाठलेला आहे.

अग्निशमन विभागासारख्या अति संवेदनाशिल व नागरीकांच्या जिवीत व मालमत्तेशी संबंधीत विभागात अपात्र व्यक्तींची नेमणूक दुर्भाग्यपूर्ण आहे. या सदोष नेमणूकांमुळे भविष्यातील कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास पालिकेचा अग्निशमन विभाग असमर्थ आहे अशी कबुली दि. ३०/०६/२०११ च्या पत्रानुसार प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिली आहे. या भरती प्रक्रियेमध्ये या अधिकाऱ्यास कोठेही सहभागी करण्यात आलेले नव्हते ही बाब अत्यंत गंभीर असुन अशाप्रकारचा आपल्या विभागातील भ्रष्ट भरती प्रक्रिये बद्दल लिखित स्वरुपात विरोध करणाचा अधिकाऱ्याचा प्रयत्न हा पालिकेच्या इतिहासातील पहिलाच प्रसंग असावा.

ही बाब अत्यंत भयावह असून कोणताही लोकप्रतिनिधी अग्निशमन विभागाची ही अवस्था सहन करु शकत नाही. म्हणून शहरातील नागरीकांची सुरक्षितता लक्षात घेता अग्निशमन दलात नव्याने केलेली भरती प्रक्रियेची मा. आयुक्तांनी चौकशी करावी व या निवड प्रक्रियेमध्ये समाविष्ट असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाइ्र करावी अशा प्रकारचा ठराव मी मांडत आहे. आता श्री. मिलन म्हात्रे यांच्या सुचनेचे वाचन करतो. अग्निशमन अधिकारी, कर्मचारी यांनी सर्व सादर केलेली कागदपत्रे, प्रमाणपत्रे तसेच या प्रकरणी मा. महासभांमध्ये मंजुरी झालेले सर्व ठराव यांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच आलेल्या सर्व तक्रारी यावर तातकळ निर्णय घेऊन सर्व संबंधीत नियमानुसार भरती प्रक्रिया त्वरीत पूर्ण करावी ही विनंती.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, नियमाप्रमाणे प्रस्तावाचा एकच ठराव मांडलेला आहे आणि तो एकच देता येतो.

**मिलन म्हात्रे :-**

प्रस्ताव एकच द्यायला लागतो. आमचे तुम्ही फेटाळले आहेत. एक व्यक्ती दोन "ज" चे प्रस्ताव देऊ शकत नाही. सन्मा. अनिल सावंत ह्याचे दोन "ज" प्रस्ताव आहेत. सचिव साहेब नियम वाचा आमचे "ज" चे दोन दोन प्रस्ताव तुम्ही फेटाळले आहेत.

**नगरसचिव :-**

तहकुब सभेला एकच.............

**मिलन म्हात्रे :-**

असेही एकाच ऑडिनरी सभेकरता एका सदस्यांचा एकच "ज" चा प्रस्ताव स्विकारू शकता ह्या सभेत त्यांचे दोन आहेत.

**अनिल सांवत :-**

ठराव वाचा ना बघा.

**मिलन म्हात्रे :-**

'ज' वरती ठराव होउच शकत नाही. आमचे दोन फेटाळले आहेत. नियम वाचून दाखवा.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब एकच येऊ शकतो नियमाप्रमाणे काय ते सांगा.

**जयंत पाटील :-**

मा. महापौराच्य परवानगीने बोलतो, ही संपूर्ण माहिती हया सभागृहाला किंवा आमच्या सदस्याना मला सुध्दा क्लासो फर्नाडिस हयाच पत्र आलेल आहे. त्यांने ही माहिती दिलेली आहे. मूळात क्लासो फर्नाडिस हयांना निवड प्रक्रियेत सहभागी होता येते का? कारण निवड प्रक्रियेचे जे अधिकारी होते ते शासनाचे होते.

**प्रशांत पालांडे :-**

तो विषय आजचा नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आकृतीबंधामध्ये नियम आहे की, त्या विभागाचा प्रमूख असलाच पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

मतदानाला टाका. ते भरती प्रक्रियेसंबधात आम्ही ठराव केलेले आहेत. आणि जी भरती केली आहे. ती व्यवस्थित केलेली आहे. महापौरानी केलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, हयाच्याबद्दल काय नियम आहे तो सभागृहाला सांगा. म्हणजे काय नियमाच्या विरूध्द वाचायचे.

**अनिल सांवत :-**

ठराव मतदानाला टाका.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, असा मांडता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

एका सदस्याला एकच 'ज' चा प्रस्ताव मांडायचा आहे. "ज" वरती ठराव होत नाही तुमची रूलिंग आहे माझ्या ठरावा वरती .

**प्रभात पाटील :-**

त्यानी 'ज' चा विषय आणि 'ज' चा प्रस्ताव नविन आणलेला नाही. त्यांचा प्रस्ताव आहे त्याच्यावरती आमचा ठराव आहे. आम्ही वेगळा विषय आणला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

"ज" च्या प्रस्तावावर ठरावच होऊ शकत नाही. चांगले चांगले तुम्ही लोकांचे हिताचे ठराव फेटाळले आहेत.

**भगवती शर्मा :-**

महापौर साहेब तुम्ही रूलिंग दया. विषय संपला.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब पहिल्यांदा नियम सांगा. आणि मग ठराव वाचा.

**नगरसचिव :-**

तहकुब सभेत दुसरे कामकाज घेता येत नाही. परंतु त्यांनी प्रकरण क्र. ४३ करिता........

**प्रशांत पालांडे :-**

विषय वेगळा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

'ज' वरती ठराव होऊ शकतो का?

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब ठराव वाचा,

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, एखाद्या अधिकाऱ्याच निलंबन आहे ते ह्या प्रस्तावात येऊ शकते का?

**भगवती शर्मा :-**

आमचा तोच विषय आहे.

**प्रशांत पालांडे :-**

तो विषयच नाही.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, तुम्ही वाचन का करत नाही.

**अनिल सावंत :-**

भगवतीजी ह्याच्या प्रस्तावामध्ये अग्निशमन अधिकाऱ्याचा प्रस्ताव आहे. तुम्ही ठराव वाचा.

**मिलन म्हात्रे :-**

ते नविन लागलेले अग्निशमन अधिकारी क्लासो साहेब आता नाही लागले. जे नव्याने लागले त्यांचा आहे तो. त्या शब्दाचा अर्थ निराळा करू नका. सचिव साहेब तो जो अधिकारी कामावर आहे. त्याचाबद्दल नाही.

**नगरसचिव :-**

दोन ठराव आलेले आहेत. दुसरा ठराव मी वाचतो. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागात सहाय्यक अग्निशमन अधिकारी या पदावर श्री. क्लासो फर्नांडीस हे कार्यरत आहेत. महानगरपालिकेने अग्निशमन विभागाअंतर्गत मा.उच्च न्यायालयाचे निर्देशाचे अनुषंगाने मंजुर पदे महानगरपालिकेच्या सेवाशर्ती नियम -२००५ अंतर्गत नमुद तरतुदीप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाचे १९९६ च्या निकालाचे अनुषंगाने व्यापक प्रसिध्दी वृत्तपत्रात व सेवायोजन कार्यालये, महानगरपालिकेचे संकेतस्थळ इ. मध्ये पदे भरण्याची जाहिर प्रसिध्दी करून उमेदवाराचे अर्ज मागविण्यांत आले होते. मुदतीत महानगरपालिकेस प्राप्त अर्जदाराची स्पर्धात्मक परिक्षेद्वारा, लेखा परिक्षा घेवून लेखी परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची शारिरीक क्षमता चाचणी परिक्षा व तोंडी परिक्षा मिळून एकत्रीत गुणाची सरासरी पहाता गुणानुक्रमे उत्तीर्ण उमेदवाराची अंतिम निवड यादी महानगरपालिकेने जाहिर प्रसिध्द करून उमेदवारांना नेमणुक केली त्या नेमणुकीस मा. महासभेने मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. महासभेने याबाबत संबंधित उमेदवारांचे शैक्षणिक पात्रतेचा त्यांच्या संस्थेकडून मुळ प्रमाणपत्र वेरिफिकेशन करून आणण्यात यावी व त्यानंतर त्यांना त्या पदावर नेमणूक करावी. असेही स्पष्टपणे ठरावात नमूद केले होते. दाखले खोटे आढळल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेबाबत ठरावात नमूद केलेले आहे. अशाप्रकारे निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रा व्यतीरीक्त अन्य शासनमान्य संस्थातुन किमान सहा महिन्याचे अग्निशमन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांची

प्रशिक्षण दरम्यान संस्थेची नोंदणी वैध व शिकविण्यांत येत असलेला पाठयक्रम राज्य/केंद्र शासनाचे प्रमाणित केल्याप्रमाणेच असल्याचे पडताळणीचे अटीवर तसेच सदर उमेदवारांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण संस्थेजवळ आवश्यकता असल्यास अग्निशमन पाठयक्रम प्रशिक्षणास पाठविण्याचे तसेच प्रशिक्षण यशस्वी पूर्ण करण्याच्या अटीवर मंजुरी दिलेली आहे. अशाप्रकारे महासभेने मंजुरी दिल्यानंतर कामावर हजर असलेल्या उमेदवारांना काही येत नसल्याबाबत जाहिर दुरचित्रवाणीसमोर वक्तव्ये करणे किंवा पदाधिकारी, नगरसेवक यांना लेखी पत्र देणे हि बाब गैरशिस्तीची असुन अधिका-याने विहीत मार्गाने मा. उपायुक्त, मा. आयुक्त, मा.प्रधान सचिव अशा क्रमवारीने त्यांचेवर अन्याय होत असेल तर दाद मागणेची पध्दत आहे. परंतु त्यांचेवर कोणताही अन्याय झालेला नसताना केवळ दृष्ट हेतुने महानगरपालिकेस बदनाम करण्याचा कट केला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त,अपील व वर्तणुक) नियम **-१९७९ चे कलम -३** अन्वये अधिका-यांवर काही बंधने निश्चित केली आहेत. त्याचा भंग अधिका-यास करता येत नाही परंतु श्री. क्लासो फर्नांडीस, सहा. अग्निशमन अधिकारी यांनी शिस्त व वर्तणुक नियमाचा भंग केलेला असुन त्यांचे या वर्तनामुळे महानगरपालिकेची सर्वत्र बदनामी झालेली आहे. तरी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त, अपिल व वर्तणुक) नियमाचा भंग करणा-या अधिका-यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - १९४९ चे कलम - ५६ अन्वये चौकशीसाठी  निलंबित करण्यांत यावा व ज्यांनी ज्यांनी प्रशासनाची व मनपाची खोटी बदनामी केली त्यांच्यावर प्रशासनाने कायदेशीर कारवाई करावी. व संपूर्ण कारवाई झाल्यानंतर अहवाल मा. महासभेपुढे ठेवावा असा ठराव मांडत आहे. ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन दलात अधिकारी व कर्मचारी यांची भरती प्रक्रिया नुकतीच पूर्ण करण्यात आली. या भरती प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.या संदर्भात शासन निर्णय व मार्गदर्शक तत्वांची पायमल्ली करुन शासनाच्या आदेशाचा अवमान करण्याचे धारीष्ट्य प्रशासनाने दाखविले आहे.

अग्निशमन दलात नव्याने सबस्टेशन ऑफीसर, लिडींग फायरमन, यंत्रचालक व फायरमन या पदांवर नेमणुका करण्यात आल्या. शासन निर्णय (क्र.एफ.एफ.एस.१६२००३/७०७/प्र.क्र.७८/२००३/नवि-६, मंत्रालय-३२, दि. २४/०६/२००४), मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे पत्र (क्र.७७६/अस, दि.२९/१०/२००९), जाहिराती मधील अटीशर्ती व सेवा प्रवेश नियमानुसार या नेमणूका झाल्या नसल्याचे उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. दि. २०/०६/२०११ रोजी एकाच दिवशी यंत्रचालकाकडून झालेल्या दोन अपघातावरुन भरती प्रक्रियेतील निष्काळजीपणा व झालेला भ्रष्ट्राचार अधोरेखीत होतो. अग्निशमन वाहने चालविण्याचा अनुभव नसलेल्यांना यंत्रचालक पदी नेमून प्रशासनाने भ्रष्ट्राचाराचा कळस गाठलेला आहे.

अग्निशमन विभागासारख्या अति संवेदनाशिल व नागरीकांच्या जिवीत व मालमत्तेशी संबंधीत विभागात अपात्र व्यक्तींची नेमणूक दुर्भाग्यपूर्ण आहे. या सदोष नेमणूकांमुळे भविष्यातील कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास पालिकेचा अग्निशमन विभाग असमर्थ आहे अशी कबुली दि. ३०/०६/२०११ च्या पत्रानुसार प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिली आहे. या भरती प्रक्रियेमध्ये या अधिका-यास कोठेही सहभागी करण्यात आलेले नव्हते ही बाब अत्यंत गंभीर असुन अशाप्रकारचा आपल्या विभागातील भ्रष्ट भरती प्रक्रिये बद्दल लिखित स्वरुपात विरोध करणाचा अधिका-याचा प्रयत्न हा पालिकेच्या इतिहासातील पहिलाच प्रसंग असावा.

ही बाब अत्यंत भयावह असून कोणताही लोकप्रतिनिधी अग्निशमन विभागाची ही अवस्था सहन करु शकत नाही. म्हणून शहरातील नागरीकांची सुरक्षितता लक्षात घेता अग्निशमन दलात नव्याने केलेली भरती प्रक्रियेची मा. आयुक्तांनी चौकशी करावी व या निवड प्रक्रियेमध्ये समाविष्ट असणा-या दोषी अधिका-यांवर कारवाइर करावी अशा प्रकारचा ठराव मी मांडत आहे. आता श्री. मिलन म्हात्रे यांच्या सुचनेचे वाचन करतो. अग्निशमन अधिकारी, कर्मचारी यांनी सर्व सादर केलेली कागदपत्रे, प्रमाणपत्रे तसेच या प्रकरणी मा. महासभांमध्ये मंजुरी झालेले सर्व ठराव यांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच आलेल्या सर्व तक्रारी यावर तातकळ निर्णय घेऊन सर्व संबंधीत नियमानुसार भरती प्रक्रिया त्वरीत पूर्ण करावी ही विनंती. या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोण आहेत का?

**मा. महापौर :-**

सन्मा. भगवती शर्मा ह्यांचा ठराव मंजुर झालेला आहे. ह्यांच्या बाजूने ३९ विरोधात १ आणि तटस्थ १७ आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. भगवती शर्मा ह्यांनी त्यांच्या सुचनेवर मांडला आहे. ठरावात उल्लेख करा.

**मा. महापौर :-**

सन्मा. प्रशांत पालांडे १८

**मिलन म्हात्रे :-**

पालांडेची सुचना आणि पालांडेचा ठराव सन्मा. अनिल सावंतची सुचना आणि सन्मा. भगवतीचा ठराव अस ह्याच्यात पाहिजे.

**मा. महापौर :-**

भगवतीजीचा ठराव बहुमताने मंजूर झालेला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

महापौर साहेब अनिल सावंत ह्यानी एक प्रश्न विचारलेला गुन्हे दाखल झाले की नाही त्याची माहीती सभागृहाला द्या.

**प्रकरण क्र. ४३ :-**

अग्निशमन दलात अधिकारी व कर्मचारी यांची नव्याने केलेली भरती प्रक्रिया रद्द करुन रितसर चौकशी करणेबाबत.

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागात सहाय्यक अग्निशमन अधिकारी या पदावर श्री. क्लासो फर्नांडीस हे कार्यरत आहेत. महानगरपालिकेने अग्निशमन विभागाअंतर्गत मा.उच्च न्यायालयाचे निर्देशाचे अनुषंगाने मंजुर पदे महानगरपालिकेच्या सेवाशर्ती नियम -२००५ अंतर्गत नमुद तरतुदीप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाचे १९९६ च्या निकालाचे अनुषंगाने व्यापक प्रसिध्दी वृत्तपत्रात व सेवायोजन कार्यालये, महानगरपालिकेचे संकेतस्थळ इ. मध्ये पदे भरण्याची जाहिर प्रसिध्दी करून उमेदवाराचे अर्ज मागविण्यांत आले होते. मुदतीत महानगरपालिकेस प्राप्त अर्जदाराची स्पर्धात्मक परिक्षेद्वारा, लेखा परिक्षा घेवून लेखी परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची शारिरीक क्षमता चाचणी परिक्षा व तोंडी परिक्षा मिळून एकत्रीत गुणाची सरासरी पहाता गुणानुक्रमे उत्तीर्ण उमेदवाराची अंतिम निवड यादी महानगरपालिकेने जाहिर प्रसिध्द करून उमेदवारांना नेमणुक केली त्या नेमणुकीस मा. महासभेने मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. महासभेने याबाबत संबंधित उमेदवारांचे शैक्षणिक पात्रतेचा त्यांच्या संस्थेकडून मुळ प्रमाणपत्र वेरिफिकेशन करून आणण्यात यावी व त्यानंतर त्यांना त्या पदावर नेमणूक करावी. असेही स्पष्टपणे ठरावात नमूद केले होते. दाखले खोटे आढळल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेबाबत ठरावात नमूद केलेले आहे. अशाप्रकारे निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रा व्यतीरीक्त अन्य शासनमान्य संस्थातुन किमान सहा महिन्याचे अग्निशमन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांची प्रशिक्षण दरम्यान संस्थेची नोंदणी वैध व शिकविण्यांत येत असलेला पाठयक्रम राज्य/केंद्र शासनाचे प्रमाणित केल्याप्रमाणेच असल्याचे पडताळणीचे अटीवर तसेच सदर उमेदवारांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण संस्थेजवळ आवश्यकता असल्यास अग्निशमन पाठयक्रम प्रशिक्षणास पाठविण्याचे तसेच प्रशिक्षण यशस्वी पूर्ण करण्याच्या अटीवर मंजुरी दिलेली आहे. अशाप्रकारे महासभेने मंजुरी दिल्यानंतर कामावर हजर असलेल्या उमेदवारांना काही येत नसल्याबाबत जाहिर दुरचित्रवाणीसमोर वक्तव्ये करणे किंवा पदाधिकारी, नगरसेवक यांना लेखी पत्र देणे हि बाब गैरशिस्तीची असुन अधिका-याने विहीत मार्गाने मा. उपायुक्त, मा. आयुक्त, मा.प्रधान सचिव अशा क्रमवारीने त्यांचेवर अन्याय होत असेल तर दाद मागणेची पध्दत आहे. परंतु त्यांचेवर कोणताही अन्याय झालेला नसताना केवळ दृष्ट हेतुने महानगरपालिकेस बदनाम करण्याचा कट केला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त,अपील व वर्तणुक) नियम -१९७९ चे कलम -३ अन्वये अधिका-यांवर काही बंधने निश्चित केली आहेत. त्याचा भंग अधिका-यास करता येत नाही परंतु श्री. क्लासो फर्नांडीस, सहा. अग्निशमन अधिकारी यांनी शिस्त व वर्तणुक नियमाचा भंग केलेला असुन त्यांचे या वर्तनामुळे महानगरपालिकेची सर्वत्र बदनामी झालेली आहे. तरी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त, अपिल व वर्तणुक) नियमाचा भंग करणा-या अधिका-यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - १९४९ चे कलम - ५६ अन्वये चौकशीसाठी निलंबित करण्यांत यावा व ज्यांनी ज्यांनी प्रशासनाची व मनपाची खोटी बदनामी केली त्यांच्यावर प्रशासनाने कायदेशीर कारवाई करावी.
व संपूर्ण कारवाई झाल्यानंतर अहवाल मा. महासभेपुढे ठेवावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १) मिलन वसंत म्हात्रे | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र |
| २ | पाटील उमाताई शाम | | २ | वर्षा गिरधर भानुशाली |
| ३ | वेतोस्कर राजेश शंकर | | ३ | राजु यशवंत भोईर |
| ४ | सुनिता कैलास पाटील | | ४ | मोहन महादेव जाधव |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | | ५ | सिंह मदन उदितनारायण |
| ६ | शशिकांत जगन्नाथ भोईर | | ६ | म्हात्रे कल्पना महेश |
| ७ | सुनिता शशिकांत भोईर | | ७ | पाटील शरद केशव |
| ८ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | ८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर |
| ९ | शेख मुसर्रतबानु इब्राहिम | | ९ | बाविघर सिसिलीया विजय |
| १० | जंगम लक्ष्मण गणपत | | १० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार |
| ११ | सपार उमा विश्वनाथ | | ११ | पांडे स्नेहा शैलेश |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | | १२ | दुबे रामनारायण सदानंद |
| १३ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | | १३ | यादव मिरादेवी रामलाल |
| १४ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | | १४ | पाटील प्रविण मोरेश्वर |
| १५ | शफीक अहमद सादत खान | | १५ | पाटील अनंत रामचंद्र |
| १६ | प्रमोद जयराम सामंत | | १६ | पालांडे प्रशांत भगवंतराव |
| १७ | मर्लिन मर्विन डिसा | | १७ | पाटील संध्या प्रफुल्ल |
| १८ | विजया हेमचंद्र वैती | | | |
| १९ | ठाकुर कल्पना हरीहर | | | |
| २० | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २१ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | |
| २२ | भट दिप्ती शेखर | | | |
| २३ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २४ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| २५ | पाटील प्रेमनाथ गजानन | | | |
| २६ | नयना गजानन म्हात्रे | | | |
| २७ | तिवारी दिव्या अशोक | | | |
| २८ | वैती नर्मदा यशवंत | | | |
| २९ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३० | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३१ | हेलन गोविंद जॉर्जी | | | |
| ३२ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३३ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | | | |
| ३४ | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | | | |
| ३५ | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ३६ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ३७ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ३८ | अनिता जयवंत पाटील | | | |
| ३९ | टेरी पॉल परेरा | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४४, सन्मा. सदस्य श्री. शफीक अहमद सादत खान यांचे दिनांक १५/०७/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांनी साहित्य क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगीरी केल्याबद्दल केंद्रशासनाने त्यांना सर्वोच्च पुरस्काराने सन्मानीत केलेले असल्याने महानगरपालिकेद्वारे मानचिन्हे व मानपत्रे देवून जाहिर नागरी सत्कार करणेबाबत.

**एस.ए.खान :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमुद केलेल्या नागरीकांना साहित्य क्षेत्रात विशेष उल्लेखनिय कामगीरी केल्याबद्दल केंद्रशासनाने त्यांना सर्वोच्च पुरस्काराने सन्मानीत केलेले आहे.

१) श्री. अखलाक खान शहरयार - सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार (उर्दु) सन – २०१०
२) श्री. सलाम बीन रज्जाक - साहित्य अकादमी पुरस्कार (उर्दु) २ वेळा
३) श्री. लक्ष्मण दुबे - साहित्य अकादमी (सन २०१०-११) (सिंधी)
४) श्री. वकार कादरी - साहित्य अकादमी (मराठी ते उर्दु भाषांतर)

सदर साहित्यीक मिरा भाईंदर शहरातील रहिवासी असून त्यांना महापालिकेद्वारा मानचिन्हे व मानपत्रे देवून त्यांचा जाहीर नागरी सत्कार करणेबाबतच्या प्रस्तावास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. तसेच या नागरी सत्कारास मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री सांस्कृतिक कार्य, मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य, मा.

मंत्री उत्पादन शुल्क, उपारंपारिक उर्जा तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा, संपर्क मंत्री, स्थानिक आमदार (मिरा भाईंदर) यांना निमंत्रण करावे, याकरिता येणाऱ्या खर्चास ही महासभा मंजुरी देत आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

महापौर साहेब माझी एक सुचना आहे. प्रकरण ४४ वरून आपणास कळविण्यात येते की, आपल्या शहरात भायंदर पूर्व जैसल पार्क येथे राहणारे पंडित सुधाकर मिश्रा ह्यांना देखील महाराष्ट्र राज्य साहीत्य पुरस्कार २००९-१०, तुलसी सन्मान उत्तर प्रदेश सरकार पुरस्कार २००७, कबीर सन्मान उत्तर प्रदेशचे सरकार २००५ ह्यांचे देखील नावाचा समावेश करण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर साहेब माझी अशी सुचना आहे की, ह्याच्यात आपल्या नगरसेवकाकडून सुचना मागवून घ्या. प्रत्येक विभागात, प्रत्येक वॉर्डात आणि मिरा भाईंदर शहरात असे अनेक सन्मा. व्यक्ती आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

महापौर साहेब, मी एक पत्र दिल होत. शरिर सौष्ठव स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर बक्षिस मिळवले आहे. त्याचा सभागृहात बोलवून सम्मान करावा. परंतु तुम्ही सभागृहात बोलवून सम्मान केला नाही. त्याचा समावेश ह्याच्यामध्ये करून घ्यावा.

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदर शहरात ज्या व्यक्ति सम्मानित असतील त्याबाबत ठराव खान साहेबांनी मांडलेला आहे. त्याच्यात नगरसेवकांना नाव द्यायची असतील त्यांनी द्यावी ते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांनी साहित्य क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगीरी केल्याबद्दल केंद्रशासनाने त्यांना सर्वोच्च पुरस्काराने सन्मानीत केलेले असल्याने महानगरपालिकेद्वारे मानचिन्हे व मानपत्रे देवून जाहिर नागरी सत्कार करणेबाबत.

**ठराव क्र. ४६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमुद केलेल्या नागरीकांना साहित्य क्षेत्रात विशेष उल्लेखनिय कामगीरी केल्याबद्दल केंद्रशासनाने त्यांना सर्वोच्च पुरस्काराने सन्मानीत केलेले आहे.

१) श्री. अखलाक खान शहरयार - सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार (उर्दु) सन – २०१०
२) श्री. सलाम बीन रज्जाक - साहित्य अकादमी पुरस्कार (उर्दु) २ वेळा
३) श्री. लक्ष्मण दुबे - साहित्य अकादमी (सन २०१०-११) (सिंधी)
४) श्री. वकार कादरी - साहित्य अकादमी (मराठी ते उर्दु भाषांतर)

सदर साहित्यीक मिरा भाईंदर शहरातील रहिवासी असून त्यांना महापालिकेद्वारा मानचिन्हे व मानपत्रे देवून त्यांचा जाहीर नागरी सत्कार करणेबाबतच्या प्रस्तावास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. तसेच या नागरी सत्कारास मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री सांस्कृतिक कार्य, मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य, मा. मंत्री उत्पादन शुल्क, उपारंपारिक उर्जा तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा, संपर्क मंत्री, स्थानिक आमदार (मिरा भाईंदर) यांना निमंत्रण करावे, याकरिता येणाऱ्या खर्चास ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंह व अनुमोदक श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

वरील विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की आपल्या शहरात भाईंदर पूर्व, जेसलपार्क येथे राहणारे श्री. सुधाकर मिश्रा ह्यांना

१) महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार – २००९-१०
२) तुलसी सन्मान उत्तर प्रदेश सरकार - २००७
३) कबीर सन्मान उत्तरप्रदेश सरकार - २००५

ह्यांनासुध्दा साहित्य क्षेत्रात विशेष कामगीरी बद्दल बरेच पुरस्कार मिळालेले आहे. तरी त्यांचे नांव समाविष्ठ करण्यात यावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४५, सन्मा. सदस्य श्री. अनिल दिवाकर सावंत यांचे दिनांक १५/०७/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर शिक्षण मंडळ अंतर्गत असणाऱ्या शाळांमध्ये स्वच्छतागृहांची व्यवस्था सुधारणेबाबत.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब, महानगरपालिकेच्या असलेल्या शाळा त्याच्या स्वच्छतेबद्दल हा प्रस्ताव आहे. आणि तो प्रस्ताव सगळ्यांना मिळाल्यामुळे मी तो प्रस्ताव वाचत नाही. बऱ्याचशा शाळाना मा. महापौर मी स्वतः शिक्षण मंडळातील काही सहकारी मिळून आम्ही व्हिजीट केलेली आहे. ह्या शाळेच्या स्वच्छतेवर पालिकेने लक्ष ठेवणे आणि कंट्रोल करणे फार गरजेच आहे. मी ठराव मांडतो त्याप्रमाणे कारवाई करावी ही विनंती.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या अगोदर शिक्षण मंडळाचे काय ठराव आहेत का? ते सत्ताधाऱ्यांच मंडळ आहे. ते मंडळ काय करते.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर शिक्षण मंडळा अंतर्गत शाळांमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी पर्यंत मुले-मुली शिक्षण घेत असतात. या शाळांमध्ये स्वच्छतागृहांची नीट सोय नसल्यामुळे मुलांचे विशेषतः मुलींचे शाळेत येण्याचे प्रमाण घटते. यावर महानगरपालिकेने कार्यवाही करणे अत्यंत गरजेचे आहे. काही शाळांची प्रत्यक्ष पाहणी केली असता, वरील विषया संबंधी प्रशासन किती उदासीन आहे, याची कल्पना येते.

तरी याविषयी खालील उपाययोजना मिरा भाईंदर शिक्षण मंडळा अंतर्गत शाळांमध्ये व खाजगी शाळांमध्ये तातडीने कराव्यात व तशा स्पष्ट सुचना संबंधीत विभागांना द्याव्यात.

१) महापालिकेच्या शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असावीत.
२) महापालिकेच्या शाळांमध्ये कायमस्वरुपी सफाई कामगारांची नेमणूक करावी.
३) महापालिकेच्या शाळांमध्ये जलशुध्दीकरण यंत्रणा बसवून पिण्याच्या पाण्याची सोय करावी.
४) महापालिकेच्या शाळांमध्ये कायमस्वरुपी सुरक्षा रक्षकाची नेमणूक करावी.
५) ज्या शाळांमध्ये वर्गाची पडझड झालेली आहे, अशा शाळांमध्ये बांधकाम विभागाला त्वरीत आदेश देऊन त्या ठिकाणी ताबडतोब दुरुस्ती करावी. असा मी ठराव मांडत आहे.

**एस.ए.खान :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर साहेब मला ह्या विषयावर बोलायचे आहे. शाळेच्या बाबतीत माझ्या निर्दशनास काही गोष्टी आल्या आहे. त्या तुम्ही ऐकून घ्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ह्या विषयावर काही सुचना आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्या बाबतीत मी महापालिकेला पत्र दिल होत की, शाळेची साफसफाई कोण बघते, आरोग्य खात्याला पत्र दिल आहे. आपल्या ज्या ३९ शाळा आहेत. त्यामध्ये आपल्या महापालिकेच्या शाळेमध्ये कुठले कुठले ठेकेदार किंवा अस्थायी कामगार दिले आहेत. त्यांची आम्हाला माहीती द्यावी. गंमतीची अशी गोष्ट आहे की आरोग्य खात्याला पत्र देतोय की, शाळेच्या साफसफाईच काम आम्ही बघत नाही. शाळेच्या साफसफाईच काम शिक्षण खात्याकडे वर्ग केलेल आहे. आणि शिक्षण खात्याकडे माहीती घेतली असता त्यांना माहीतीच नाही. स्थायी कामगार आमच्याकडे किती आहेत. कुठल्या शाळेत किती वर्ग केले त्यांना काही माहीती नाही. महापौर साहेब प्रशासनाच पत्र आहे. शाळेवर कुठले कामगार आहेत. दोघा डिपार्टमेन्टला माहीत नाही. आरोग्याला सुध्दा माहीत नाही. आणि शिक्षण अधिकाऱ्याला देखील माहीत नाही. आज शिक्षण अधिकारी नाहीत. शिक्षण अधिकाऱ्याला बोलवा. तुमच्याकडे किती कामगार आहेत.

**मा. महापौर :-**

हा ठराव सर्वानुमताने पास झालेला आहे.

**प्रकरण क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर शिक्षण मंडळ अंतर्गत असणाऱ्या शाळांमध्ये स्वच्छतागृहांची व्यवस्था सुधारणेबाबत.

**ठराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर शिक्षण मंडळा अंतर्गत शाळांमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी पर्यंत मुले-मुली शिक्षण घेत असतात. या शाळांमध्ये स्वच्छतागृहांची नीट सोय नसल्यामुळे मुलांचे विशेषतः मुलींचे शाळेत येण्याचे प्रमाण घटते. यावर महानगरपालिकेने कार्यवाही करणे अत्यंत गरजेचे आहे. काही शाळांची प्रत्यक्ष पाहणी केली असता, वरील विषया संबंधी प्रशासन किती उदासीन आहे, याची कल्पना येते.

तरी याविषयी खालील उपाययोजना मिरा भाईंदर शिक्षण मंडळा अंतर्गत शाळांमध्ये व खाजगी शाळांमध्ये तातडीने कराव्यात व तशा स्पष्ट सुचना संबंधीत विभागांना द्याव्यात.

१) महापालिकेच्या शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असावीत.
२) महापालिकेच्या शाळांमध्ये कायमस्वरुपी सफाई कामगारांची नेमणूक करावी.
३) महापालिकेच्या शाळांमध्ये जलशुध्दीकरण यंत्रणा बसवून पिण्याच्या पाण्याची सोय करावी.
४) महापालिकेच्या शाळांमध्ये कायमस्वरुपी सुरक्षा रक्षकाची नेमणूक करावी.
५) ज्या शाळांमध्ये वर्गाची पडझड झालेली आहे, अशा शाळांमध्ये बांधकाम विभागाला त्वरीत आदेश देऊन त्या ठिकाणी ताबडतोब दुरुस्ती करावी. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, १३/०७/२०११ रोजी मुंबई शहरामध्ये तीन बॉम्बस्फोट झाले. दुखद घटना ह्या शहरामध्ये घडली. आपल्या शहरातील तीन नागरीक ह्या बॉम्बस्फोटामध्ये मृत झालेले आहे. आणि आठ नागरिक जखमी झाले आहेत. आपल्या सर्वांच्या भावना त्यांच्या पाठीशी आहेतच. परंतु यासंबंधी जी मदत करण्याची घोषणा आहे ती महापौर करतील. मृतांची नाव हिमंत भाई गदिया, उपतभाई नवडीया आणि संदीप जैन जखमी झालेल्यांची नावे आहेत. खोडा भाई दुगरणी, वल्लबभाई गदिया, भावेश भाई मनिया, अजगर भाई झवेरिया, हरेश भाई लखानी, पंकज भाई पटेल, मनिश मनकुकीया आणि बिपीनार वैशाली.

**राजेश वेतोस्कर :-**

एस.व्ही. रोडला दास म्हणून व्यक्ति एक्सपायर झाले.

**मा. महापौर :-**

नकळत एक दोन माणसाची नाव राहीली असतील त्यांची देखील नाव घेण्यात येतील. जे मृत्यूमुखी झालेले आहेत. त्यांना प्रत्येक ५०,०००/- रू. आणि जखमीना २५,०००/- रू. द्यायचे ठरवले.

**मिलन म्हात्रे :-**

काशी गावात जे १० जण मृत झाले. त्यांना सुध्दा ह्या सभेत श्रध्दांजली अर्पण करावी. आणि या मिरा भाईंदर शहरातील स्थानिक समाज सेवक श्री. जनार्दन नारायण रकवी ह्यांची वहिनी सुलोचना मधुकर रकवी ह्यांना ही श्रध्दांजली अर्पण करत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शिक्षण अधिकारी जबाब द्यायला आले आणि तुम्ही सभागृह संपवता.

**शशिकांत भोईर :-**

आपल्या समाजातील सभागृहातील नगरसेवक माजी नगराध्यक्ष स्वर्गीय डॉ. प्रफुल्ल काशीनाथ पाटील ह्यांच्या मातोश्री कमला बाई काशीनाथ पाटील ह्यांचे निधन झालेले आहे. तसेच आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये सेवा निवृत्त झालेले माजी आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक ह्यांच्या आईचे सुध्दा निधन झाले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडतो.

**अनिल सावंत :-**

थोर समाजसेविका साधनाताई आमटे ह्या बाबासाहेब आमटेच्या पत्नी होत्या ज्यांनी नंदनवनामध्ये कुष्ठरोग्याची अतोनात सेवा केली त्यांचा शोकप्रस्ताव मांडतो.

**नगरसचिव :-**

सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून मृतात्म्यास श्रध्दांजली वाहायची आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ४८ :-**

दि. १३/०७/२०११ रोजी मुंबई शहरामध्ये तीन बॉम्बस्फोट झाले. या स्फोटामध्ये आपल्या शहरातील तीन नागरीक ह्या बॉम्बस्फोटामध्ये हिमंत भाई गदिया, उपतभाई नवडीया आणि संदीप जैन मृत झालेले आहेत तसेच एस.व्ही. रोडला दास म्हणून व्यक्ति एक्सपायर झाले. तसेच काशी गावात जे १० जण मृत झाले. त्यांना सुध्दा ह्या सभेत श्रध्दांजली अर्पण करावी. आणि या मिरा भाईंदर शहरातील स्थानिक समाज सेवक श्री. जनार्दन नारायण रकवी ह्यांची वहिनी सुलोचना मधुकर रकवी ह्यांना ही श्रध्दांजली अर्पण करत आहे. तसेच आपल्या समाजातील सभागृहातील नगरसेवक माजी नगराध्यक्ष स्वर्गीय डॉ. प्रफुल्ल काशीनाथ पाटील ह्यांच्या मातोश्री कमला बाई काशीनाथ पाटील ह्यांचे निधन झालेले आहे. तसेच थोर समाजसेविका साधनाताई आमटे ह्या बाबासाहेब आमटेच्या पत्नी होत्या ज्यांनी नंदनवनामध्ये कुष्ठरोग्याची अतोनात सेवा केली त्यांचा

शोकप्रस्ताव मांडतो. तसेच आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये सेवा निवृत्त झालेले माजी आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक ह्यांच्या आईचे सुध्दा निधन झाले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडतो.

**सुचक :- श्री. राजु वेतोस्कर** **अनुमोदक :- श्री. मिलन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची संपली असे जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ २.१५ वाजता**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**